अध्यात्म

गीता

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः॥ पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्॥१॥ पृथापुत्रा वत्सा निजनयनयुग्में निरखितां॥ सुगोपें ओटीला मृदुतर करें स्पर्श करितां॥ कृपेनें पान्हेला बहु उपनिषद्धेनुनिकर तुह्मी प्या तें हें हो अमतिपय गीतारु मधुर॥१॥

॥ श्री ॥

# ॥ गीता ॥

## ॥ भावचंद्रिका ॥

श्रीकृष्णार्जुनसंवाद

मराठीभाषेंत

रामचंद्रशास्त्री मुडले यांचे साहाय्यानें

बाळजी रुंदरजी

याणीं करून

मुंबईंत गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत

छापिली

संवत् १८९६

शके १७६१

श्रीगीतेचा अर्थ प्रकटिला हिला प्राकृ
त भला ॥ २ मोये थें वाटे निखिल जन
हो श्री स्थिर मला ॥ श्री संतोषा पाचो-
अणु लघु गुणींही बुधजन ॥ महादे
षीरोषा नच विनवि ऐसें मम मन ॥ १

॥श्री॥

## अर्जुनविषाद

ग्रं. ........
ता. ........

श्रीगणेशायनमः॥ ॥पूर्वसंकेताप्रमाणें पांडव अज्ञानवास भोगून प्रकट जाहलेअसतांत्याणीं आपल्या राज्यविभागार्थ कौरवांशीं बोलणें घातलें, त्यास दुर्योधन सर्वप्रकारें अमान्य जाहला, त्याजवर मोठायुद्धप्रसंग मांडला,त्यासमयीं रणामध्यें जेंजें होईल तेंतें आपणास घरीं स्वासनीं वर्तेंचर समजावें अशी धृतराष्ट्रास इच्छा झाली, ती पूर्ण करण्याविषयीं व्यासानीं ज्ञानचक्षु देवून संजयास योजिलें. त्याप्रतधृतराष्ट्र प्रश्नकरितो, हेसंजया, धर्माचेंक्षेत्र असेजें,कुरुक्षेत्र, त्याचाठायीं युद्धकरायासाठींमिळाले असे माझेपुत्र आणि पांडूचेपुत्र, कायकरिते जाहले तें मला सांग. १

संजय सांगतो त्यासमयीं राजादुर्योधन पांडवांचा सेनेचा व्यूह पाहून द्रोणाचार्याप्रतये

॥अर्जुनविषाद॥

ऊन बोलता जाहला. २ गुरुजी, तुमचा शिष्य
द्रुपदराजाचापुत्र धृष्टद्युम्न त्याणें पांडवांचा
थोरसेनेचा व्यूह रचिला पहा! ३ यासेनेचाठा
यीं भीमार्जुनासारिखे, आणि युयुधान, विराट
द्रुपद, ४ धृष्टकेतु, चेकितान, काशिराज, पुरुजि
त्, कुंतिभोज, शैब्य, ५ युधामन्यु, विक्रांत, उत्त-
मोजा, तसाच सुभद्रेचा पुत्र अभिमन्यु, आणि
द्रौपदीचेपुत्र हे सर्व महारथ आहेत. ६ आतां
आपल्या सेनेचाठायीं विख्यात कोण आहेतत्यां
ची सूचना करितों, ती ऐकावी. ७ आपणतसेंच
भीष्माचार्य, कर्ण, कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण
सोमदत्ति ८ आणिरवी बहुत शूर मजकरितांजी
विताची आशा टाकून प्राप्त जाहले आहेत. आणि
ते सर्वशस्त्रसंपन्न असून युद्धविद्येमधें पर-
मनिपुण आहेत. ९ आपल्या अगणितसेनेचें
आधिपत्य भीष्माकडे आहे. आणि शत्रूचा प
रिमित सेनेचें आधिपत्य भीमाकडे आहे.॥१०॥

## ॥ अर्जुनविषाद ॥

आतां तुह्मी सर्वयोद्धे यथाविभागें करून आ
पल्या आपल्या स्थानीं राहून भीष्माचार्यास र
क्षा. ११

तें भाषण ऐकून दुर्योधनास प्रमोद करा
याकरितां भीष्माचार्यांहीं मोठ्यानें सिंहनादक
रून शंख वाजविला. १२ तत्क्षणीं असंख्यात
शंखादि वाद्यांचा दारुण शब्द जहाला. १३ त्या
समयीं कृष्णार्जुन शुभ्राश्वयुक्त उत्तम रथाव
र आरूढ होते त्यांहींही आपले शंख वाजविले.
१४ कृष्णानें पांचजन्य शंख, आणि अर्जुनानें
देवदत्त, भीमानें आपला पौंड्र शंख, वाजविला
१५ आणि युधिष्ठिरें अनंतविजय, तसेंच नकु
ल सहदेवीं आपले सुघोष, मणिपुष्पक. शंखवा
जविले, १६ काशिराज, शिखंडी, धृष्टद्युम्न, वि
राट, सात्यकि, १७ राजा द्रुपद, द्रौपदीचे पुत्र, सु
भद्रेचा पुत्र, इत्यादिक वीरांहीं आपले आपले पृ
थक् पृथक् शंख वाजविले. १८ त्या घोषानें कौ

रवांचीं हृदयें विदारण पावलीं. आणि दशदिशा प्रतिध्वनित जहाल्या. ॥१९॥

मग अर्जुन कौरव युद्धाविषयीं सिद्ध जाहले. आणि शस्त्रें चालू जाहलीं. असें पाहून धनुष्य सिद्ध करून २० कृष्णाप्रत बोलता जाहला. हे कृष्ण, दोन सेनेच्या मध्यें माझा रथ उभा कर. २१ ह्मणजे मी युद्धाविषयीं कोण सिद्ध आहेत. आणि मीं या सिद्ध रणभूमीच्या ठायीं कोणा बराबर युद्ध करावें २२ आणि येथें दुर्बुद्धि दुर्योधनाचें प्रिय करायास कोण मिळाले आहेत तें सर्व अवलोकीन. २३

संजय ह्मणतो, कृष्णें अशी प्रार्थना ऐकून दोन सेनाच्या मध्यभागीं रथ उभा करून २४ कौरवांच्या फळ्यांकडे अर्जुनाची नेत्रें लावून त्याकरवीं भीष्मद्रोण प्रमुख त्या पक्षाचे मुख्य योद्धे पाहविले. २५ तेव्हां अर्जुन दोनही सेनाच्या ठायीं पाहता जहाला. त्यामधें कित्तीएक

## ॥ अर्जुन विषाद ॥ १॥

तीर्थसरूप, तसेच आजे, गुरु, मामा, भाउ, पु
त्र, नातू, मित्र, २६ सासरे, स्रुह्रत्, असे सर्वही
आप्त आहेत असें कांहींवेळ पाहून २७ त्याचा
हृदयीं फार दया लोटली, आणि खेद पावत हो
त्साता कृष्णाप्रत बोलता जाहला.

हे कृष्णा. युद्ध करायाकरितां जमले हे सा
रे आपले नातेचार आहेत असें पाहून माझीं
आगें सेल होतात, आणि मुख शुष्क होतें. त
सें शरीर कांपतें, आणखीं माझ्या आंगावर
रोमांच उभे राहतात, २९ हातांतून गांडीव ध
नु गळतें, तसाच त्वचेच्याठायीं दाह होतो! मज
उभें राहण्याचीही शक्ति नाहीं, कांकीं माझें म
न भोंवतें, ३० आणि दुश्चिन्हें सभोंवतीं मा
झ्या दृष्टीस पडतात. आणखी आपल्या आ
प्तजनास मारून कांहीं सुख दिसत नाहीं.
३१ अगा हे कृष्णा, मीं विजयातें इच्छित नाहीं,
मला राज्य नको, मला सुख नको आह्मास राज्यें

करून काय, विषयभोगें करून काय, जीवितें
करून काय? ३२ कांकीं ज्यां साठीं राज्यविषय
भोग इच्छावे, तेच धन आणि प्राण टाकून, या
सिद्धरणभूमीच्या ठायीं युद्धाकरितां उभे राहिले
आहेत. ३३ हे गुरु, बाप, लेंक, आजे, नातू, मा
मा, सासरे, मेहुणे, ३४ यांस माराव्याची इच्छा मी
त्रैलोक्य राज्याच्या लोभें करूनही करणार नाहीं.
मग या लहान भूगोळाच्या तर पदार्थ काय! ३५
या कौरवांस मारून आह्मी काय सुख पावों?
यद्यपि ते दुष्ट आहेत खरे; तथापि आह्मी त्यां-
स मारिलें तर दोषी मात्र होवूं. ३६ यास्तव हे आ
मचे जवळचे आप्त यांस मारावें हें आह्मास के
वळ अनुचित आहे. अगा हे कृष्णा, विचार करू
न पाहा, कुलक्षय करून आह्मास सुख कसें
होईल? ३७ जरी हे कुलक्षय आणि मित्रद्रोह
करण्यांत पातक पाहात नाहींत, ३८ तथापि
आह्मी तद्दोष जाणून त्या कर्मास कसेंरे प्रवृत्त

ह्मावें. ३९ कुलक्षयेंकरून अनादिसिद्ध कुलधर्म बुडतात. त्या धर्मनाशानें तें सर्व कुल अधर्मयुक्त होतें ४० तेणेंकरून कुलस्त्रिया व्यभिचारिणी होऊन वर्णसंकर होतो. ४१ तो सर्व कुलास नरकांत पाडितो, आणि श्राद्धादिक कर्मे बुडतात, त्यायोगानें त्यांचे पूर्वजही नरकांत पडतात. अशा वर्णसंकरकारक कुलोच्छेददोषानें जातिधर्मांचा आणि कुलधर्मांचा लोप होतो. ४३ आणि ऐकण्यातही असें आहे कीं जां मनुष्यांच्या संततीत धर्म बुडतो त्यांस सद्गति होत नाहीं. हरहर! कवढे थोर पातक करण्यास हो आह्मी सिद्ध जहालों आहों! राज्यसुखाच्या लोभेंकरून आह्मी स्वजन मारायास किंहो उद्युक्त झालों आहों! ४५ जर हे कौरव शस्त्रें घेऊन अनिवारित येऊन मला अशस्त्र्याला यारणभूमीचाठायीं मारितील तर मी त्यांस सुखें मारूं देईन ४६

॥सांख्ययोग॥२॥

संजय ह्मणतात हे धृतराष्ट्रा, अर्जुनअसें बोलून आपले धनुष्यबाण टाकून शोकाविष्ट होत्साता भर सेनेमध्यें रथाचा मध्यभागीं बसता झाला. ४७

---

॥सांख्ययोग॥

॥अध्याय॥२॥

त्याप्रकारें अर्जुनास कृपाविष्ट आणि अश्रुयुक्तनेत्र तसाच खिन्न पाहून, कृष्ण त्याप्रत बोलता जहाला. अगा हे अर्जुना, हा वेडेपणा आणि हीनत्व बापा यासमरीं तुला कोठून प्राप्त झालें १ अरे ही स्थिति शूरोचित नव्हे, केवळ अस्वर्ग्य आणि अकीर्तिकारक आहे. २ तूं हा नपुंसकपणा स्वीकारूं नको, कांहा तुझ्या सारिख्याला योग्य नव्हे. हें तूं आपल्या हृदयाचें निंद्य दुर्बलत्व टाक, आणि उभा राहा कसा. ३

## ॥ सांख्ययोग ॥

अर्जुन ह्मणतो कृष्णा, भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य, हे मला पूजेस योग्य आहेत; यांजवर युद्धाचा समयीं कठोर बाणेंकरून प्रहार करण्याचा निश्चय कसा करूं ३ ४ या अति पूज्य गुरूंस मारणें, त्यापेक्षां मीं जनांत भिक्षा मागून निर्वाह करीन तें बरें. कांकीं जर यांस मारिलें तर यांचा रक्तानें आर्द्र अशे द्रव्य आणि राज्यविलास भोग सेवावे लागतील. ५ आणखी यांचा जय होईल तो बरा किंवा आपला होईल तो बरा हेंच मुळीं आह्मास समजत नाहीं. कांकीं ज्यांस मारून आह्मास जीवनाची इच्छा नाहीं, ते हे धृतराष्ट्राचे पुत्र आह्मापुढें युद्धास उभे राहिले आहेत. ६ माझा मूळस्वभाव, कृपा आणि पापभीति यांहीं करून नष्ट झाला आहे. तर मीं विनंती करितों मला खराखुरा चांगला विचार यासमयीं कोणता तो सांग. मी तुझा शिष्य आहें. यास्तव मला शरणागताला स्वधर्माविषयीं शिक्षा कर. कां

कीं या धर्मसंकटें करून माझी बुधी भ्रमली आहे. ७

हे कृष्णा, जरी या भूमीचें आठायीं निष्कंटक राज्य प्राप्त झालें, किंबहुना सकलदेवांचें आधिपत्य मिळालें, तरीं इंद्रियें शुष्क करणारा असा हा माझा शोक शमविणारें कांहीं मला दिसत नाहीं.

संजय बोलतात, हे धृतराष्ट्रा, अर्जुनानें कृष्णाप्रत असें भाषण करून आपणास युद्धकर्तव्य नाहीं ह्मणून सांगितलें; आणि तो उगा झाला. ९ त्यासमयीं कृष्ण हास्यवदन करून अर्जुनाप्रत बोलता जहाला; अरे अर्जुना, शोक करायास योग्य नव्हेत, त्यांचा शोक करितोस, आणखीं पंडितांचे वाद बोलतोस. परंतु पंडित कांहीं मेल्याचा किंवा जित्याचा शोक करित्त नाहींत. ११ हे अर्जुना मीं तूं आणखी हे राजे, कधीं नव्हतों असें नाहीं, आणखीं आपण सर्व पुढें नसणार असें नाहीं. आत्म्यास या देहीं

जसें बाळपण, तरुणपण, आणि वृद्धपण, प्राप्त
होतें, तरीच देहांतर प्राप्ति होते, असें जो पकें
मानितो तो कांहींही पडलें असतां गडबडतना
हीं. १३ इंद्रिय वृत्तींस जे विषयसंबंध होतातते
शीत उष्ण. सुखदुःख देतात. ते येतातजातात.
ते अनित्य आहेत. यास्तव हे भारता, त्यांचें सहन
कर. १४ कांकीं जा धैर्यवान् पुरुषास हे गडबडवि
त नाहींत, आणिजो सुखदुःखें समान मानितो,
तो मोक्षास योग्य होतो. १५ कल्पितवस्तूस
आहेपणा नाहीं. सत्यवस्तूस अभाव नाहीं. या
दोघांचाही निर्णय तत्वद्रष्टे पाहातात. १६ जाणें
हे सर्वपदार्थ उत्पन्न केले, त्यास नाश नाहीं असें
जाण. या अव्ययवस्तूचा नाश करायास कोणी
समर्थ नाहीं. १७ नित्य आणि अविनाशी तसा
च दुर्ज्ञेय अशा आत्म्याचीं आवरणें हे देह अंत
वंत आहेत. यास्तव हे अर्जुना, तूं युद्धास उठ. १८
जो या आत्म्यास मारणारा असें मानितो, आ-

णि जो यास मारिला असें मानितो, ते दोघेही जाणत नाहींत. कांकीं हा कोणास मारीतनाहीं, आणि यासही कोण मारित, न्हीं- एक वस्तूस झाली आहे, अथवा पुढें होईल असें म्हणतां येत नाहीं. कांकीं ती वस्तू जन्मरहित. तशीच सर्वदा एकरूप, आणि शाश्वत तसीच पुरातन आहे; ती शरीराबराबर मारिली जात नाहीं. २० जो या वस्तूला अविनाशी, नित्य, जन्मरहित, आणि अव्यय असें जाणतो, त्या पुरुषाला मी या वस्तूस मारायास शकेन किंवा मारवीन असें कसें वाटेल? २१ जसा मनुष्य जीर्णवस्त्रें टाकून नूतनवस्त्रें परिधान करितो, तसा हा आत्मा जीर्णकुडी टाकून, नूतनकुडीतें धरितो २२ या आत्म्याला शस्त्रें छेदित नाहींत, अग्नि जाळित नाहीं, पाणी कुजवित नाहीं, वायु शुष्क करित नाहीं, २३ कांकीं हा आत्मा अछेद्य, अदाह्य, अक्लेद्य, आणि आशोष्य, असा आहे,

## ॥सांख्ययोग॥२॥

आत्मा नित्य आणि सर्वव्यापी, स्थिर, अचल, २४ अदृश्य, अचिंत्य, अबाध्य, आहे. यास्तव हें जाणून तूं शोक करूं नयेस. २५ असें असतांही आत्मा हा बराबर मरतो, असें जरी मानितोस, तरी, तुला शोक [illegible] नाहीं. २६ कां कीं जन्माधीन पदार्थास मृत्यु निश्चित आहे; तसेंच मरणाधीनास पुनर्जन्म आहे. तस्मात् या अपरिहार्य गोष्टीचा शोक करणें तुला योग्य नाहीं. २७ भूतांची पूर्वस्थिति अव्यक्त आहे; मध्यस्थिति मात्र उघड आहे; पश्चात् स्थिति अव्यक्तीं आहे. तर अशांचा शोक कां करितोस ? २८ कोणी आत्म्यास आश्चर्यवत् मानितात: कोणी याजविषयीं आश्चर्यानें बोलतात, तसेंच ऐकतात, परंतु याचें वर्णन ऐकत असतां एकही यातें जाणतनाहीं. २९ हा आत्मा सर्वांचा शरीरांत निरंतर अविनाशी आहे; तस्मात् तूं या भूतांचा शोक करण्याविषयीं योग्य नाहींस. ३० तूं आपल्या जा

॥सांख्ययोग॥२॥

ति धर्माकडेस पाहा, ह्मणजे तुला हें कांपणें अ
योग्य असें समजेल. क्षत्रियास युद्धधर्म प्रा
प्त होय, त्यापरता दुसरा थोर धर्म नाहीं. ३१ अ
गा हे पार्था, तुझ्या इछेप्रमाणें हें स्वर्गद्वार तुझ्या
समोर उघडलें आहे. असेंहें युद्ध, [illegible]
क्षत्रियांस मात्र प्राप्त होतें. ३२ यानंतर जरहा
युद्धधर्म न करसील, तर स्वधर्मास आणि कीर्ती
स टाकून पापातें पावशील. ३३ जन तुझी अ
क्षय अकीर्ति गातील- आणि संभाविता सतर
अकीर्ति मरणाहून अधिक आहे. ३४ हे सर्वम
हारथ, तूं भयास्तव रणापासून परत गेलास
असें मानितील; आणि जे तुला बहु मानितात त्या
मध्येंही तूं लघुत्व पावशील. ३५ तुझे शत्रु बोल्हून
येत त्यागोष्टी तुजविषयीं बोलतील, आणि
तुझ्या शौर्यशक्तीची निंदा करितील. याहून
फार दुःखतें काय ? ३६ जर तूं मारला गेलासत
र स्वर्गातें पावशील, आणि विजयी जहालास

## ॥सांख्ययोग॥२॥

तर पृथ्वीतें भोगिसील. यास्तव ऊठ, आणि युद्धाचा निश्चय कर. ३७ सुखदुःख लाभ, अलाभ, ज[illegible]न, [illegible]य, समान करून युद्धास सिद्ध हो. अशा[illegible]चा [illegible] दोष घडणार नाहीं. ३८

[illegible] ब्रह्म त्याविषयीं बुधि सांगीतली. आतां योगाविषयीं ऐक. ज्याबुद्धीकरून युक्त होत्साता कर्मबंधातें त्यागिशील. ३९ येथें कर्माचा नाश नाहीं, आणि प्रत्यवाय नाहीं. या धर्माचें स्वल्पही आचरण महद्भयापासून सोडवितें. ४० यांत एकच बुद्धि आहे, आणि ती निश्चयात्मक आहे. अनिश्चित पुरुषांचा बुधि अनंत आहेत, आणि त्या प्रत्येक बहुशाख आहेत. ४१

अल्पमति पुरुष वेदवादीं रत होत्साते, क्षणभंगुर स्वर्ग सुखाला, आत्मज्ञान आणि तत्फल मोक्ष यांहून अधिक मानून त्यापरतें दुसरें कांहीं नाहीं असें ह्मणतात; आणि अमृतपान

॥सांख्ययोग॥२॥

पावूं, अजरामर होउं, इत्यादिकजीं पुष्पितवाक्यें त्याहींकरून भुलून, जन्मकर्में देणारी आणि नानाप्रकारचा कर्मांनीं व्यास उपराजर्म नाहेर्स्वप्राप्ती ची इछा करितात. परंतु हा त्यांला स्वर्गदा अविचार सिद्ध आहे. अशा पुरुषां [illegible] ग्र होत नाहीं. ४४ वेद तीन गुणाचा कार्यांचें प्रतिपादन करितात. तूं त्रैगुण्यातीत हो. आणि द्वंद्वरहित तसाच निरंतर सत्वस्थ राहा. श्रम आणि काळजी यांतें टाक. आणि जितचित्त हो. ४५ भरपूर जलाशयांत जितुकें स्नानादिक प्रयोजन घटमात्रजलानें होतें, तितुकें जाणत्या जिज्ञासूला सर्ववेदीं, उपनिषद्भागानें होतें. ४६

तुझा कर्माचाठायींच अधिकार-तस्मात् कर्मकरत्याचा फळांवर वासना कदापिही ठेवुंनको. तसेंच फलहेतूनें कर्मकरूंनको. अकर्मीं आग्रह धरूंनको. ४७ योगस्थ, ह्मo समचित्त होत्साता, अभिमान सोडून, कर्माचा बरावाईट परिणा

## ॥सांख्ययोग॥२॥

म समान मानून, स्वधर्म आचर. अशा समत्वास योग ह्मणतात. ४८ बुद्धियोगाहून, ह्म० निष्काम कर्माहून, का[illegible] अत्यंत नीच आहे. यास्तव बुद्धीचा आश्रय कर. कांकीं फळकामुक दीन [illegible]दुःखी असतात. ४९ या सृष्टींत बुद्धियुक्त पुरुष पुण्य आणि पाप या दोंतें मानित नाहीं. यास्तव तूं अशा बुध्दियोगाकारणें झट योग, ह्म० कर्माचा ठायीं चातुर्य होय. ५०

ज्ञानीपुरुष कर्माचें फळ टाकून, जन्मबंधापासून मुक्त होऊन निरुपद्रव पदाप्रत जातात ५१

जा समयीं तुझी बुद्धि तुझा अंतःकरणाचा मालिन्यास तरेल, त्या समयीं तुला ऐकिल्याचें, आणि ऐकायाचें तात्पर्य समजून, त्याविषयीं वैराग्य पावशील. ५२ जेव्हां नाना शास्त्र श्रवणें करून संशययुक्त झालेली अशी तुझी बुध्दि निश्चल होवून ईश्वरध्यानीं अचल राहील, तेव्हां तूं तत्वज्ञान पावशील. ५३

## ॥ सांख्ययोग ॥ २ ॥

अर्जुन विचारितो, हे कृष्णा. स्थितबुद्धि
ध्यानस्थाची खूण कोणती ? त्याणें बोलावें
काय ? असावें कसें आ... ...वें कसें ? ५४
कृष्ण सांगतात. हे पार्था, जो मनुष्य मना
तील सर्व वासना टाकितो, आणि आपण...
ठायीं आपण संतुष्ट होतो, त्याला स्थितबुद्धि अ
सें ह्मणतात. ज्याचें मन विपत्तींत गडबडत ना
हीं, आणि जो संपत्ती विषयीं निरिच्छ आणि
ज्याचे चिंता, भय, क्रोध, गेले आहेत, अशा
स्थितबुद्धि पुरुषास मुनि असें ह्मणतात. ५६
जो सर्व गोष्टींत लोभरहित असतो, जो शुभ पावो
न आनंदानें प्रशंसा करित नाहीं, आणि अशुभ
पावोन द्वेषानें निंदा करित नाहीं, अशा पुरुषाची
बुद्धि स्थिर झाली असें जाणावें. ५७ आणि जो,
जसा कांसव अंगाचें आकर्षण करिता तसा
विषयांपासून इंद्रियाचें आकर्षण करितो, तोए
... स्थिर... समजावा. ५८ केवळ विषयत्या

ग्यासच स्थितप्रज्ञ ह्मणतात असा अर्थ नाहीं. कांकीं कांहींएक प्रसंगेंकरून अज्ञाचेही विषय निवृत्त होत. [illegible]ची विषयमूलवासनाही गेली तो स्थितप्रज्ञ जाणावा. ५९ अत्यंत मथन करणारीं अशीं इंद्रियें मनोजयाविषयीं यत्न करणार अशाही ज्ञानीपुरुषांचा मनाचें आकर्षण करितात. ६० त्यांस स्वाधीनकरून सावध आत्मपर असा स्थितप्रज्ञ असतो. इंद्रियें ज्याचा स्वाधीन त्याची बुद्धि निश्चल जाणावी. ६१

विषयाचें ध्यान करणार पुरुषांस, त्याविषयांत संग होतो, विषयसंगापासून काम होतो. कामापासून क्रोध होतो, ६२ क्रोधापासून मोह होतो, मोहापासून स्मृतिभ्रंश पावते, स्मृतिभ्रंशेंकरून बुद्धि नष्ट होते, बुद्धिनाशेंकरून पुरुष नाश पावतो. ६३ स्वाधीन चित्त पुरुष आपलीं इंद्रियें रागद्वेषरहित करून, मनाचा आज्ञेंत वागवितो. तो विषयांतें भोगित होत्साता

ही, ब्रह्मसुखातें पावतो. ६४ तें प्राप्त होतांच तो सर्वदुःखापासून सुटतो. असें त्याचें चित्त प्रसन्न झालें ह्मणजे त्याची बुद्धि नक्की दृढ होते. ६५ जो पुरुष या विषयाचें श्रवण मनन करित नाहीं, त्यास ज्ञान आणि भावना नाहीं, भावना रहितास शांति नाहीं, जास शांति नाहीं त्यास सुख कोठून? ६६ ज्याचें मन विषय प्रवृत्त इंद्रियांस अनुसरतें, त्या पुरुषाचा बुद्धीस तें जसें वादळ समुद्रांत नौकेस तसें घेऊन जातें. ६७ तस्मात् ज्याचीं इंद्रियें मनासहवर्तमान विषयांपासून निवृत्त आहेत, तो स्थितप्रज्ञ होय. ६८ त्यांस* अज्ञजनांचा रात्रीचा ठायीं दिवस, आणि त्यांचा दिवसांचा ठायीं रात्रि असते.

जसीं सागरांत उदकें शिरतात तेणेंकरून तो विकार न पावतां भरलाच राहतो, तसे जा पु

---

* ब्रह्मप्रकाशीं भूतें निद्रित असतात तेथें हा जागृत असतो आणि प्रपंचीं भूतें जागृत आहेत तेथें हा निद्रित असतो. सारांश इतरजन अज्ञानी आणि हा ज्ञानी ह्मणावयाचा प्रकार

रुषाप्रत विषयप्रवेश करितात, तो मोक्ष पावतो: विषयासक्त पावत नाहीं. ७० जो पुरुष सर्वकाम त्यागून, वासनारहित वागतो, आणि जास अहंकार आणि अभिमान नाहीं, तो मोक्षातें पावतो. ७१ अगा हे अर्जुना, ही ब्रह्मवेत्याची स्थिति होय. ही प्राप्त झाली असतां मनुष्य मोह पावत नाहीं. अंतकाळींही जरीं ही स्थिति प्राप्त झाली, तरीं तो निर्वाणब्रह्मीं मिळतो.

---

## ॥कर्मयोग॥

### ॥ अध्याय॥३॥

अर्जुन बोलतो, अगा हे जनार्दना, जर तुझ्या मतें कर्मयोगाहून ज्ञान अत्यंत प्रशस्त आहे, तर या घोरयुद्धकर्माचा ठायीं मज कां प्रवर्तवितोस? १ तूं मिश्रितासारिख्या वचनेंकरून माझ्या बुद्धीस भ्रम वितोस, असें मला वाटतें. यास्तव जेणेंकरून मी कल्याण पावेन, असें

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

एक कायतें निश्चयकरून मला सांग. २

कृष्ण सांगतात. हे पापरहिता, निष्ठेचे मार्ग दोन ते मीं तुला मार्गें सांगीतले: विचार समर्थांचा ज्ञानमार्ग, आणि योग्यांचा कर्ममार्ग सांगीतला ३

मनुष्यास कर्म न केल्यानें ज्ञाननिष्ठा प्राप्त होत नाहीं. तो कर्मजन्य चित्तशुध्दीवांचून केवळ सन्यासानेंच सिध्दीतें पावत नाहीं. ४ कोणही पुरुष कधीं क्षणमात्र कर्म केल्यावांचून राहात नाहीं. कारण सत्व, रज, तम, हे तीन प्रकृतिगुण पुरुषाला अवश्य कर्म करण्याविषयीं प्रवर्तवितात. ५ जो पुरुष आसक्त असून कर्मेंद्रियांस आरोपून बसतो, त्यास ढोंगी असें ह्मणतात. कांकीं त्याचें मन विषयांकडेस लंपट असतें. ६ तर जो मनासह वर्तमान इंद्रियांस वश करून वासना रहित कर्म करितो, तो स्तुत्य होय. ७ तूं नियत कर्म आच

॥ कर्मयोग ॥ २ ॥

र. अकर्मापेक्षें कर्म अत्यंत चांगलें आहे. कर्म न केल्यानें तुझा देहव्यवहारही चालणार नाहीं. ८ हा जन ईश्वरभक्तिवांचून इतर स्वर्गादिकामनेनें कर्मांत प्रवृत्त झाला आहे, यामुळें बंधन पावतो. तस्मात् हे कुंतीपुत्रा, तूं त्या सर्वकामना टाकून ईश्वरप्रीत्यर्थ स्वधर्म आचर. ९

जेव्हां पूर्वीं ब्रह्मदेवानें प्रजा उत्पन्न केल्या, तेव्हां त्यांस त्याचवेळेस धर्म लावून दिल्हा. आणि सांगीतलें कीं. "या धर्मेंकरून तुह्मी वृद्धीतें "पावा. हा तुमचे सर्वमनोरथ पूर्ण करिता अ"सो. १० या धर्मेंकरून देवांस तृप्त करा. आणि "तेदेव तुह्मास तृप्त करोत. असे तुह्मी परस्परां"स तृप्त करित होत्साते, परम कल्याणातें पावा"ल. ११ दान इत्यादि धर्मेंकरून संभावित असे "देव तुह्मास इच्छितभोगांतें देतील. जो, त्यांहींजें "दिलें, त्याचा भाग त्यांस अर्पिल्यावांचून भोगि"तो तोचोरच होय. १२ जे यज्ञशेष अन्नाचांचू.

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

"न भोजन करित नाहींत, ते सर्व दोषांपासून
"मुक्त होतात. जे आपणांसाठींच अन्न शिजि
"वितात, ते स्वयें पापरूप होत, आणि भोजन
"ही पापाचें करितात." १३. भूतें अन्नापासून उ
त्पन्न होताहेत, तें अन्न पर्जन्यापासून, पर्जन्य
यज्ञापासून, त्या यज्ञाची उत्पत्ति कर्मापासून,
१४ कर्म वेदापासून, वेद ब्रह्मापासून. तस्मात्
सर्वव्यापक ब्रह्म यज्ञाच्या ठायीं नियमें करून रा
हिलें आहे. १५

पापी पुरुष इंद्रियांच्या ठायीं रममाण होवू
न जो या प्रवर्तिचक्रातें अनुसरत नाहीं, त्याचें
जिणें व्यर्थ होय. १६

परंतु जो पुरुष आपलेच ठायीं रत असतो,
आणि आपला आपण तृप्त असतो, आणि आ
पला आपल्यांत संतुष्ट असतो, त्यास कांहींच
कर्तव्य नाहीं. १७ त्यास केल्यांत आणि न के
ल्यांत प्रयोजन नाहीं. आणि त्यास सर्वांभूतीं

कोणत्याच अर्थाचा संबंध नाहीं. १८ यास्तव निरंतर आवश्यक कर्म, फलवासना टाकून कर. कांकीं जो पुरुष असक्तपणें कार्यकर्म करितो, तो मोक्षातें पावतो. १९

कर्मेंकरूनच जनकादिक सिद्धि पावले. आणि रवी लोक संग्रहार्थही तुला कर्म केलें पाहिजे. २० कांकीं थोरांचें पाहून लहान वागतो. कारण जें तो करितो त्यास लोक अनुसरतो. २१ अगा अर्जुना मला स्वतः यात्रैलोक्यांत कांहीं कर्तव्य नाहीं, अथवा मला अप्राप्त वस्तु मिळावयाची आहे असें नाहीं. तथापि मीं, कर्म करितोंच आहें. २२ जर मी जपून कर्माचा ठायीं लक्ष न देईन, तर लागलेच सर्व मनुष्य माझा मार्ग धरतील. २३ जर मी कर्म न करीन, तर हे जन अव्यवस्थित होतील. आणि मी वर्णसंकराचा कर्ता होईन, आणि प्रजांचा नाश करीन. २४ जसे अज्ञजन फलेच्छेनें कर्म करितात, त

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

सींच ज्ञान्यानें लोकसंग्रहार्थ फलेच्छेवाचून कर्में करावीं. २५ कर्माकडे ज्यांचा ओघ अशा अज्ञाचा बुद्धिभेद करूं नये. विद्वान् मनुष्यानें सर्व कर्में स्वयें यथास्थित करून, मूढ प्रीतीनें करीत असें करावें. २६

अहंकारानें मोहित पुरुष प्रकृतीच्या गुणांनीं क्रियमाण कर्मांचा मींच कर्ता असें मानितो. २७ परंतु जो पुरुष जडचैतन्याचा वेगळेपणा जाणतो, तो पुरुष प्रकृतीचे गुण आपआपलीं कर्में करितात, असें मानून आपण आपला निराळा असतो. २८ प्रकृतीच्या गुणांनीं मोहित पुरुष देहादिक गुणांच्याठाईं आणि कर्मांच्याठायीं आसक्त असतात. त्या किंचित्ज्ञास, सर्वज्ञानें कर्मांपासून चळवूं नये. २९

अर्जुना, सर्व कर्में माझ्याठाईं अर्पण कर. आणि एकाग्र चित्त करून आशा, ममता, शोक, यांस सोड. आणि युद्धाचा निश्चय कर. ३०

॥कर्मयोग॥३॥

जे मनुष्य दृढ विश्वासानें या माझा मताप्रमाणें निरंतर चालतील, आणि त्या विषयीं कांहींच कल्पना मनांत आणणार नाहींत, ते कर्मापासून मुक्त होतील. ३१ आणि जे यास तुच्छवत् मानून याप्रमाणें वागणार नाहींत, ते सर्वज्ञानरहित, अविवेकी, नष्ट, ह्म० स्वर्गापवर्ग भ्रष्ट असें जाण. ३२

ज्ञानवान्ही पुरुष आपल्या स्वभावानुरूप वर्तणुक करितो. सर्वभूतें आपआपल्या स्वभावास अनुसरतात. तेथे निग्रह काय करील? ३३ सर्व इंद्रियांचा विषयांत प्रीति आणि द्वेष आहेत, त्यांचा स्वाधीन शाहण्यानें होऊं नये. कां कीं ते उभयतां शत्रु होत. ३४ परधर्म कितिकां चांगला असेना, आणि कितिकां सांग आचरिना, तथापि स्वधर्म कसाही असो, आणि कसाही आचरो, तो त्यापेक्षें फार प्रशस्त होय. स्वधर्मी मरण बरें; परध-

र्मात भय आहे. ३५

अर्जुन प्रश्न करितो, हे कृष्णा, मनु
ष्यास पापाचरणीं काय प्रवर्तवितें ? दिस-
ण्यांत असें येतें कीं हा इच्छित नसतां याचीच
लात्कारानें तेथें योजना होते. ३६

कृष्ण सांगतात, हा काम, हा क्रोध, रजो
गुणापासून उत्पन्न झालेला, आणि सर्वग्रास
करणारा, महापापस्वरूप-हा दोषाचरणीं प्रव
र्तविणारा असें जाण. ३७ जसा धुरानें अग्नि,
मलानें दर्पण, अथवा वेष्टनानें गर्भ आच्छा-
दित असतो, तसाहा जन त्याणें वेष्टित आहे.
३८ अर्जुना या कामरूप नित्य वैऱ्यानें ज्ञात्या
चें ज्ञान आच्छादित आहे. या अग्नीची शांति
करणें मोठें कठिण कर्म आहे. ३९ इंद्रियें, मन,
आणि बुध्दिही याचें स्थान आहे, असें ह्मणता-
त. यांचा आश्रय करून हा ज्ञानातें आच्छादू
न जीवाला मोहित करतो. ४० तस्मात् तूं आ

॥ज्ञानयोग॥४॥

हीं इंद्रियाचें नियमन करून या ज्ञानविज्ञान नाशक पाप्याचा पराजय कर. ४१

इंद्रियें बाह्यप्रपंचाहून पर आहेत. इंद्रियांहून मन पर, मनाहून बुधि; आणि जो बुधीहून परतो तो. ४२ याप्रमाणें बुधीहून पर आत्म्यास जाणून आणि मनाला बुधीचा योगें करून या दुर्जय कामशत्रूचा पराभव कर. ४३

---

## ॥ज्ञानयोग॥

### ॥अध्याय॥४॥

कृष्ण ह्मणतात, मी हा अविनाशी योग पूर्वी सूर्यास वर्णिला, सूर्यानें मनूस सांगितला, आणि मनूनें इक्ष्वाकूस उपदेशिला. १ तो असा परंपरेनें चालला. त्यास राजर्षि जाणत होते; पुढें बहुकालानें त्याचा लोप झाला. २ तूं माझा भक्त आणि सखा आहेस, ह्मणोन तोच पुरातन योग आज मी तुला सांगितला. हें उत्तम र

स्य होय. ३

अर्जुन प्रश्न करितो, कृष्णा, तुझें जन्मत र सूर्याचा आलीकडचें. तेव्हां तूं सूर्यास हायोगउपदेशिला हें मी कसें समजावें? ४

कृष्ण उत्तर करितात. अर्जुना, तुझीं आणि माझीं जन्में बहुत गेलीं, तीं सर्व मी जाणतों, तूं जाणत नाहींस. ५

यद्यपि मी जन्मातीत, आणि अविनाशी, तसाच सर्वभूतांचा स्वामी आहे, तथापि आपल्या प्रकृतीचाठाईं राहून, स्वशक्तीनें जन्म धारण करितो. ६ जाजावेळेस धर्माची ग्लानि होते, आणि अधर्माचें प्राबल्य होतें, त्या-त्यासमयीं मी याजगांत प्रकट होतों. ७ असा मी युगायुगाचाठाईं साधूंचा रक्षणार्थ, दुष्टांचा नाशार्थ, आणि धर्माचा संस्थापनार्थ अवतार धरितों. ८

अगा हे अर्जुना, जो माझें जन्म, आणि

॥ज्ञानयोग॥४॥

कर्म असें अलौकिक आहे, असें तत्वेंकरून जाणतो, तो देहांतर पावत नाहीं. तो मत्स्वरूपीं मिळतो. ९ बहुत एक प्रीति, भय, क्रोध, यांस टाकून मदाकार होत्साते माझ्या आश्रयेंकरून ज्ञानतपेंकरून पवित्र होत्साते, मत्स्वरूपीं मिळाले. १० मनुष्य सर्वप्रकारें माझ्या मार्गास अनुसरतात. त्यांस जे जशी माझी सेवा करितात, तसा मी त्यास अनुकूळ होतों. ११

मनुष्यलोकीं कर्मापासून सिद्धि त्वरित होते, ह्मणून तिचा इच्छेनें कामुक मनुष्य इंद्रादि देवताचें आराधन करितात. १२

मी चारवर्ण गुणेंकरून, आणि कर्मेंकरून, निराळे असे निर्माण केले. त्यांचा मी कर्त्ता असतांही मला अकर्त्ता आणि अविकारी असें जाण. १३

मला कर्मलेप नाहीं. आणि मला त्यांच्या फलाचा ठाईं इच्छा नाहीं. असें जो मला जाण

॥ ज्ञानयोग ॥ ४ ॥

तो, तो कर्मेंकरून बद्ध होत नाहीं. १४ पूर्वींचेही मुमुक्षु हें जाणूनच कर्म करीत होते. यास्तव ते जसें करीत तसें तूं कर्म कर. १५ कर्म कोणतें, आणि अकर्म कोणतें, याविषयीं विद्वान्ही भ्रांत आहेत. आतां तें कर्म कायतें मी तुला सांगेन जें जाणून तूं अशुभापासून सुटशील. १६ कर्म, विकर्म, आणि अकर्म, यांच्या तत्वाचा बोध झाला पाहिजे. कर्मांचा मार्ग गहन आहे. १७ जो कर्मांत अकर्म, आणि अकर्मीं कर्म पाहतो, तो मनुष्यांत ज्ञाता, आणि योगी, आणि सकल कर्म कर्त्ता होय. १८

ज्याचे सर्व उद्योग वासना आणि संकल्प, ह्मणजे मी करितों असा अभिमान, यां रहित, आणि ज्याचीं कर्में ज्ञानरूप अग्नीनें दग्ध, अशा पुरुषास बुधजनं पंडित ह्मणतात. १९ तो कर्मांच्या फलाची वासना टाकितो, आणि नित्यतृप्त तसा निराश्रय असा असतो, आणि

तो कर्मांच्याठायीं प्रवृत्तअसतांही कांहींच करीत नाहींसा असतो. २० ज्यास आशा नाहीं, ज्याचीं चित्त, देह, आणि इंद्रियें, ही स्वाधीन आहेत, आणि ज्याणें संसार सोडिला, तो केवळ शरीरधर्म करितहोत्साता, पापातें पावत नाहीं. २१ जोदेवानें प्राप्तहोईल त्यांत संतुष्ट, ज्यास द्वंद्व सुखदुःखादिभेद, आणि मत्सर नाहीं, तसाच सिद्धि, आणि असिद्धि, यांच्याठाईं समान, तो कर्मेंकरूनही बंधन पावत नाहीं. २२ ज्याचा कर्तृत्वाभिमान गेला, जो कर्मबंधापासून मुक्त, ज्याचें चित्त ज्ञानीं स्थित आहे, आणिजो श्रद्धभक्तीकरितां कर्म आचरितो, त्याचें कर्म सर्वप्रकारें लीन होतें. २३ आत्मज्ञान्यास यज्ञांतील पात्रें, द्रव्य, अग्नि, यजमान, आणि देवता, तसेंच त्याकर्माचें फल, सारांश सर्वकर्म ब्रह्ममय होय. २४

कित्येक देव यज्ञ करितात, स्त० इंद्रा{

देवताप्रीत्यर्थ हवन करितात. कित्येक ज्ञान यज्ञ करितात, ह्मं० ब्रह्मरूप अग्नींत जीवाचें आत्मरूपेंकरून हवन करितात, ह्मज्जा उपाधीनें चैतन्यास जीवदशा प्राप्त झाली, त्या उपाधीचा निरासकरून त्यास शुध्दरूपेंकरून निर्विशेष ब्रह्मांत मिळवितात. २५ कित्येक नियमरूप अग्नीचाठाईं कर्णादिकइंद्रियाचें हवन करितात, आणि कित्येक इंद्रियरूपअग्नींत शब्दादिविषयाचें यजन करितात, ह्मं० इंद्रियांस विषयविमुखकरून त्यांत शब्दादिविषयांचें अर्पणकरितात. २६ आणिखी कित्येक ज्ञानदीपित, अशाबुद्धि नियमरूप अग्नींत इंद्रियकर्में, आणि प्राण कर्में, होमितात. २७ तसेंच कित्येक द्रव्ययज्ञ, ह्मं० वापी, कूप, दानादिक करणारे आहेत. कित्येक तपोयज्ञ, ह्मं० चांद्रायणादि तप करणारे आहेत. कोणी योगयज्ञ करणारे ह्मं० यम, निय-

आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान समाधिरूप योग करणारे आहेत. कोणी स्वाध्याय, म्ह० वेदपाठ तद्रूप यज्ञ करणारे आहेत; तसेच स्वाध्याय ज्ञानयज्ञ करणारे आहेत. हे यज्ञकर्ते अति तीव्र व्रत होत. २८ कित्येक प्राणाचें अपानांत हवन करितात, म्ह० उर्ध्व वायूस अधोवायूंत नेतात, तसेच प्राणांत अपानास ओढितात, आणि दोघांचाही गति रोधून प्राणायाम करितात. २९ कित्येक विषय निवृत्त होत्साते प्राणांत प्राणास होमितात. म्ह० इंद्रियाचा मनाचा ठाई, मनाचे चित्ताचा ठाई, आणि चित्ताचा अहंकारीं संहार करितात. हे सर्व यज्ञकर्ते आपापल्या यज्ञाचरणें करून पापापासून शुद्ध होतात. ३० पंच महायज्ञाचें शेष अशा अमृताख्य अन्नास भोगणारे चित्तशुद्धिद्वारा सनातन ब्रह्माप्रत पावतात. यज्ञ न करणारास

हा लोक नाहीं. मग ह्यापा अर्जुना परलोक कोठून होणार ? ३१

अरे नानाविध यज्ञ वेदामधें विस्तारित आहेत, परंतु ते सर्व कायिक, वाचिक, मानसिक, कर्मापासून होत असें जाण. हें जाणून मुक्त होसील. ३२ या बाह्यांतर द्रव्यमय यज्ञांहून ज्ञानयज्ञ ह्म० सर्व काया. वाचा, मन, यांचा प्रवृत्तीची उपरमदशा हा अत्यंत चांगला होय. हा मागें ज्ञानयज्ञ सांगीतला, त्याचा परिपाक जाणावा. ज्ञानांत सर्व कर्म आहे. ३३ तें ज्ञान तत्वद्रष्टे ज्ञानी यांपासून, नमन, प्रश्न, सेवा, याहीं करून संपादन कर. ३४ ह्मणजे तूं पुनः अशा मोहांत पडणार नाहींस, आणि तुला सर्व भूतें ब्रह्ममय दिसतील. ३५ यद्यपि तूं अति पापी असल्यास, तथापि ज्ञानरूप नौकेनें निःसंशय पापरूप समुद्रास तरशील. ३६ जसा

॥ज्ञानयोग॥४॥

प्रदीप्त अग्नि काष्ठांस भस्म करितो, तसा
ज्ञानाग्नि सर्व कर्मांस भस्म करितो. ३७ सृ
ष्टींत ज्ञानासारिखें पवित्र अन्यवस्तु नाहीं.
जो पुरुष योग, म्ह० निष्काम कर्मानुष्ठान, अ
थवा समाधि, याणेंकरून परिपक्व, तो का
लेंकरून तें आत्मज्ञान पावतो. ३८ श्रद्धावा
न्, तत्पर, जितेंद्रिय, असा पुरुष ज्ञानातें पाव
तो. त्यास पावून सत्वर मुक्त होतो. ३९ आ
णि अज्ञ, श्रद्धाहीन, तसाच संशयात्मा पुरुष,
नाश पावतो. संदिग्ध चित्त पुरुषास हा लो
क, आणि परलोक, तसें सुखही नाहीं. ४० ज्या
णें योगेंकरून कर्मांचा त्याग केला, आणि
ज्याचे संशय ज्ञानेंकरून अगदीं फिटले, अ
शा ज्ञान्यास कर्में बंधन करायास असम-
र्थ आहेत. ४१ तस्मात् ज्ञानरूप खड्गेंकरू
न हा आपल्या हृदयांतील अज्ञानकृत संश
य छेदून उभा राहा, आणि निष्काम कर्म कर.

## ॥ संन्यासयोग ॥

### ॥ अध्याय ॥ ५ ॥

अर्जुन प्रश्न करितो. हे कृष्णा, तूं एकवेळ कर्म टाक असें सांगतोस, आणि पुनः कर असें सांगतोस, तर या दोहोंतून चांगलें कोणतें तें निश्चित सांग. १

कृष्ण सांगतात. कर्मत्याग, आणि कर्मयोग, हे दोघेही कल्याण कर आहेत. परंतु त्यागाहून योग बरा. २ जो प्रीति आणि द्वेष यांहीकरून रहित तो नित्य सन्यासी जाणावा. असा पुरुष द्वंद्वरहित असतो, आणि तो सुखें बंधापासून मुक्त होतो. ३ सांख्य, आणि कर्मयोग यांस पृथक् असें अज्ञ बोलतात, पंडित बोलत नाहींत. एका विषयीं चांगली निष्ठा असली ह्मणजे दोहोंचें फल पावतो. जें स्थान सांख्यांस प्राप्त होतें, तेंच योग्यासही होतें. जो सांख्य, आणि योग, य

॥ संन्यासयोग ॥५॥

उभयतांस एक जाणतो तोच जाणता ज्ञा॰
तोच ज्ञाता. ५ कर्म केल्यावांचून कर्मत्याग
होणें मोठें दुःख आहे. कर्म करणारा मुनि ब्र
ह्माप्रत शीघ्र पावतो. ६ जो पुरुष कर्में करि-
त असतां शुद्धात्मा, तसाच जितचित्त, आणि
जितेंद्रिय, आणि सर्वभूतमय आत्मा असें
पाहतो, तो कर्मेंकरून लेप पावत नाहीं. ७
तत्ववेत्ता पुरुष, दर्शन, श्रवण, स्पर्शन, आ
घ्राण, भोजन, गमन, निद्रा, श्वास, भाषण,
विसर्ग, ग्रहण, उन्मेष, निमेष, हे सर्व व्यापा-
र होत असतां, आपण कांहींच करित नाहीं;
इंद्रियें आपल्या विषयीं वर्तताल, असें निश्च
येंकरून मानितो. ९ जसें कमलपत्र जलानें
लिप्त होत नाहीं, तसा जो पुरुष निःसंग कर्म
करून ब्रह्मीं अर्पितो, तो पापानें लिप्त होत ना
हीं. १० योगीपुरुष अभिमान टाकून केवळ
शरीर, मन, बुधि, इंद्रियें, यांहीं करून चित्त

॥ संन्यासयोग ॥५॥

शुध्यर्थ कर्म करितात. कर्म करित असतां कर्म फलाचा त्याग केल्यानें अनंत सुख प्राप्त होतें. आणि सकामा पुरुष वासनेच्या योगानें फलासक्त होवून बंधन पावतो. १२ जितेंद्रियपुरुष मनासहवर्तमान सर्व कर्माच्या त्याग करून, देहरूप नवद्वार नगरांत कांहीं न करित होत्साता, आणि न करवित होत्साता, सुखें करून असतो. १३

चिदात्मा प्रभु, या जडवर्गास कर्तृत्व आणि कर्म उत्पन्न करित नाहीं, तसा यांस कर्म फलाचा योगही करित नाहीं. स्वभाव प्रवर्ततो. १४ व्यापक चिदात्मा कोणाचें पापपुण्य घेत नाहीं. अज्ञानानें ज्ञान आच्छादित आहे, तेणें करून प्राणी मोह पावतात. १५ परंतु जेव्हां तें अज्ञान विचारानें नाश पावतें, तेव्हां ज्ञान सूर्यवत् आत्मस्वरूपास प्रकाशवितें. १६ जांची बुद्धि परब्रह्मीं, तेंच जांचा आत्मा, ते

॥ संन्यासयोग ॥ ५ ॥

थेंच जांची निष्ठा, आणि तेंच जांचा परम आश्रय, असे पुरुष ज्ञानेंकरून निर्धूतपापहोत्साते मोक्ष पावतात. १७

विद्याविनय, संपन्न ब्राह्मण, बैल, हस्ती, श्वान, आणि चांडाल, इत्यादि सर्वांचाठायीं पंडित परब्रह्मस्वरूप समान पाहतात. १८ जांचें मन सर्वभूतीं समानभाव पावलें, ते येथेंच जन्मातीत झाले. आणि ब्रह्मीं राहिले. कारणकीं ब्रह्म समान आणि निर्दोष आहे.

प्रियपदार्थाचा प्राप्तीकरून हर्ष, आणि अप्रियपदार्थाचा प्राप्तीनें उद्वेग पावूंनये आणि स्थिरबुधि तसा मोहरहित ब्रह्मज्ञानसंपन्न, आणि ब्रह्मीं स्थित असें असावें. २० निर्द्वंत विषयांचा विस्मरणेंकरून अद्वैतपणानें जा स्रुखाचा अनुभव होतो, तत्स्रुखस्वरूप ब्रह्मवेत्ता होय. परंतु ब्रह्मवेत्त्यास इतुकाच विशेष, कीं ज्ञानास्तव तें स्रुख अक्षय असतें. २१

॥ संन्यासयोग ॥५॥

विषयभोग दुःखदाते होत. कांकीं त्यांस आदिअंत आहेत. यास्तव त्यांत ज्ञाता पुरुष रमत नाहीं. २२ जो यावद्देह कामक्रोधांचा वेगास सहायास शकतो, तो मनुष्य योगी तसा सुखी होय. २३ जो अंतरीं सुखी, ज्याचा अंतरीं आराम, आणि जो अंतर्ज्योति ह्मणजे हीं तीन ज्यास इंद्रियद्वारा नाहींत, तो पुरुष योगी. तो ब्रह्ममय होत्साता परमानंद पावतो. २४ जे ऋषि पापापासून शुद्ध, तसेच मुक्तसंशय, जितचित्त, आणि सर्वभूतांच्या कल्याणाविषयीं तत्पर आहेत, ते निर्वाण ब्रह्मातें पावतात. २५ कामक्रोधरहित आणि जितचित्त, तसेच तत्ववेत्ते अशा यतींस मरणात् प्राक्, आणि अनंतर निर्वाण ब्रह्म आहे. २६

बाह्य विषय मनांत यऊं न देतां, भ्रुकुटीचा मध्यभागीं दृष्टि ठेवून, ध्यानस्थ होत्सा

ता, प्राण, अपान यांस नाकांत समान करून, इंद्रिय मन, बुधि, यांस जिंकून, मोक्षतत्पर, आणि काम, भय, क्रोध, रहित निरंतर मुक्त, असा मुनि; यज्ञ, आणि तपें, यांचा भोक्ता, आणि अनंतकोटि ब्रह्मांडनायक, सर्व भूतांचा स्रुहृत्, अशा मला जाणून कैवल्य पद पावतो. २९

---

## ॥ अध्यात्मयोग ॥

### ॥ अध्याय ॥ ६ ॥

कृष्ण ह्मणतात, कर्मफळ टाकून जो करायाचें कर्म करितो, तो सन्यासी तसा योगी होय. जो श्रौत स्मार्ताग्नि रहित, आणि कर्मत्यक्त णारा तो योगी नव्हे. १ हे पांडवा, ज्याला सन्यास ह्मणतात, तोच योग असें जाण. ज्याणें संकल्प त्याग केला नाहीं तो योगी होत नाहीं. २ योगप्राप्तीची इच्छा होण्यास निष्का

मकर्म, तीव्र, वैराग्यद्वारा कारण होय; आ-
णि योगाचा सिद्धतेस साधन कर्मत्याग होय.
३ जेव्हां इंद्रियांचे विषय, आणि तत्प्रापकक
र्मे यांचाठाईं आसक्त होत नाहीं, तेव्हां त्यास
र्वसंकल्प सन्यासीपुरुषास योगारूढ ह्मं०
योगप्रवृत्त, अथवा योगारंभी ह्मणतात. ४
अशा क्रमानें कर्मद्वारा चित्तशुध्दीतें संपादून
योगारूढानें आपलाआपण, अभ्यास आ
णि वैराग्य यांचाबलेंकरून उद्धार करावा.
आपणास प्रपंचखेदांत घालूंनये कांकीं आ
पणच आपला मित्र, आणि शत्रु, होय. ५ म
नानें मनाचा जय केला ह्मणजे तें मित्र होय;
न केला ह्मणजे तेंच शत्रु होय. ६ शीत, उष्ण,
सुख, दुःख, मान, अपमान, यांचाठाईं ज्याचें
चित्त निर्विकार, अशा शांतपुरुषांचें चित्त के
वळ समाधिस्थ होतें. ७ ज्याचें चित्त ज्ञानवि
ज्ञानेंकरून पूरित, आणि जो कूटस्थ, ह्मं० वि

कार रहित, तसा विजितेंद्रिय, आणि ज्यास मृत्तिका, पाषाण, तसें सुवर्ण ही समान आहेत, अशा पुरुषास योगी ह्मणतात. ८ सुहृत, मित्र, शत्रु, उदासीन, मध्यस्थ, द्वेष्य, आणि संबंधी, तसे साधु, आणि पापी, यांच्याठाई ज्यापुरुषाची बुद्धि समान तो श्रेष्ठ होय. ९

योगाभ्यासी पुरुषानें वासना, आणि परिग्रह, टाकून एकलाच एकांती राहून, आणि चित्त, तसें इंद्रियांसहवर्तमान शरीर स्थिर करून, निरंतर बुद्धीचा समाधि करावा. १० त्याचा प्रकार. शुद्धस्थानीं आपणास आसनार्थ, मध्यमप्रतीचें, ह्म० अत्यंत उच्च, तसें अति नीच नव्हे, असें मृन्मय स्थंडिल करून, त्यावर दर्भ, आणि दर्भावर कृष्णाजिन, कृष्णाजिनावर वस्त्र घालून; ११ त्या अचल आसनीं बसून, चित्त, आणि इंद्रियें, यांच्या क्रिया आटोपून, मन. एकाग्र करून,

॥अध्यात्मयोग॥६॥

चित्तशुद्ध्यर्थ योग कराचा. १२ शरीर, मस्तक, तसी मान, यातें समान, कंपरहित, स्थिरपणें धारण करून, दृष्टि नासिकाग्रीं ठेवून, दिशांतें न पाहतां; १३ शांत चित्त, भयरहित, ब्रह्मचारि व्रतस्थ असून, मच्चित्तहोवून माझाठाईंच मनाचें नियमन करून, केवळ मत्पर असावें. १४ यांप्रकारें निगृहीत चित्तयोगी निरंतर चित्ताचें समाधानकरितहोत्साता, मोक्ष परम आणि मीजीचा आश्रय अशा शांतीतें पावतो. १५

फार भोजन करणारास, किंवा भोजन न करणारास, तसें फार निजणारास, आणि केवळ जागणारास, योगसिद्ध होत नाहीं. १६ तर ज्याचे आहार, विहार, परिमित आहेत; ज्याची कर्माचाठाईं व्यवस्थित प्रवृत्ति; तसें ज्याची निद्रा, आणि जागर, परिमितआहेत, अशा पुरुषास दुःखभंजनक

रणारा असा योग होतो. १७ ज्यासमयीं,नि रुद्ध,असें चित्त,आत्मस्वरूपींच राहतें,आणि पुरुष सर्व कामनांपासून निस्पृह होतो, त्यासमयीं त्यास योगी ह्मणतात. १८ योग करणाऱ्या योग्याच्या नियमित चित्तास निवातस्थानींच्या अचंचलदीपाची उपमाहोय. १९ ज्या योगावस्थेंत, योग सेवेनें निरुद्ध असें चित्त, लीन होतें, आणि अशा चित्तें करून निर्विकल्प आत्म्यास पाहात होत्साता आत्मस्वरूपीं संतोष पावतो. २० तें अनंतसुख, केवळबुद्धिग्राह्य आहे - इंद्रियांस अगोचर होय. ज्या स्वरूपीं राहिलाअसतां कांहींच अनुभवित नाहीं, आणित्या तत्वापासून चळत नाहीं. २१ जें प्राप्तझालें असतां अन्यलाभास त्यासारिखा थोर मानित नाहीं. जेथें राहत असतां पुरुषास महत्‌ही दुःखचलन करित नाहीं. २२ या

## ॥ अध्यात्मयोग ॥ ६ ॥

दुःखसंयोगाचा श्लो॰ अंतःकरणसंबंधाचा वियोगाचें नाम योग असें जाणावें. तो योग निर्वेदरहित होवून निश्चयानें अभ्यासा-वा. २३ संकल्पापासून उत्पन्न अशा सर्व कामातें निखालस टाकून, मनेंकरून इंद्रिय समुदायालें विषयांपासून आवरून, दृढबुद्धीकरून, हळूहळूं विषयांपासून उपरत व्हावें. मनास आत्मसंस्थ करून कांहींच चिंतूं नये. २५ हें अस्थिर मन जेथेंजेथें जातें, तेथून तेथून आटोपून आणून स्वरूपीं ठेवावें. २६ अशा शांत चित्त, रजोगुणरहित, ब्रह्मभूत, आणि पापरहित, योग्याला उत्तम सुख स्वयें प्राप्त होतें. २७ कल्मषरहित योगी, असें निरंतर मनाचें समाधान करित होत्साता, अनायासें ब्रह्मीं मिळोन परमानंदैकरूप सुखातें पावतो. २८ सर्वत्र समदर्शन, असा योगी, सर्व भू

॥अध्यात्मयोग॥६॥

तीं आपणास, आणि आपणांत सर्वभूतांस
पाहतो. २९ जोमला सर्वांत पाहतो, आणि
सर्वांस माझाठायीं पाहतो, त्याचा मी नाश
पावत नाहीं, ह्म० मी त्याला दूर नाहीं, आणि
माझा तो नाश पावत नाहीं, ह्म० तो मला दूरना
हीं, ह्म० आमचें एकमेकांस तिरोधान होत
नाहीं. ३० जो भेदरहित होत्साता सर्वभूत
स्थित अशामला भजतो, तो योगी सर्वप्रका
रें वागत असतां, माझाठाईंच असतो. ३१
अगाहे अर्जुना आपणासारिखेंच लोकांस
सुखदुःख होतें असें समजून; जो प्राणिमा
त्रास पीडा करित नाहीं, तो योगी श्रेष्ठ गण
ला आहे. ३२

अर्जुन पुसतो. हे कृष्णा, हा तूंजो सा
म्येंकरून योग सांगीतला त्याची स्थिति स्व
भावाचा चांचल्यामुळें मला स्थिर वाटत नाहीं.
३३ मन चंचल आणि मथनशील, बलवत्,

आणि हट्टी आहे. त्याचा निग्रह वायूचा निग्रहासारिखा मी मोठा दुष्कर मानितों. ३४

कृष्ण उत्तर करितात. हे महाबाहो, निःसंशय मन चंचळ आणि दुर्निग्रह आहे. तथापि अभ्यास, तसें वैराग्य, यांहींकरून याचा निग्रह होतो. ३५ माझा मतें अजितचित्तपुरुषास योग दुष्प्राप होय. परंतु जो स्वाधीन चित्त, अशा प्रयत्न करणारास, उपायें करून प्राप्त व्हावयास शक्य आहे. ३६

अर्जुन प्रश्न करितो. हे कृष्णा, भावें करून योगमार्गी प्रवृत्त पुरुष, प्रयत्न करित असतां, जर त्याचें मन, योगापासून चळून त्यास योगसिद्धि झाली नाहीं, तर तो कोण त्या गतीप्रत पावतो? ३७ तो कर्ममार्ग, आणि योगमार्ग, यांपासून भ्रष्ट, निराधार होत्साता ब्रह्ममार्गी मूढ, असा, छिन्न अभ्रासारिखा नाहींसा होत नाहींना? ३८

॥ अध्यात्मयोग ॥ ६ ॥

हे कृष्ण, हा माझा संशय निःशेष छेदा वयाविषयीं तूं योग्य आहेस. तूजहून आणखी कोणीही संशय दूर करणारा नाहीं. ३९

कृष्ण सांगतात. अरे बापा, त्याचा इह परत्र नाश नाहीं. कल्याण करणारा कोणीही दुर्गतीस पावत नाहीं. ४० (अपघातानें) योगापासून भ्रष्ट पुरुष पुण्यलोकांप्रत जावून, तथें बहुत वर्षें वास करून, पवित्र श्रीमंताचा घरीं पुनः जन्म घेतो. ४१ यद्वा बुध्दिमान् अशा योग्यांचा गृहीं जन्म धारण करितो. लोकांत असें जन्म होणें परम दुर्लभ होय. ४२ तेथें तो पूर्वदेहींचा बुद्धीसंयोगास पावतो, आणि पुनः योगसिध्यर्थ यत्न करितो. ४३ तो पराधीन असला तथापि त्यास पूर्वाभ्यास योगास लावितो. तो योगाची इच्छा बाळगीत असतांही कर्मकांड वेदातीत होतो. (स्लं० त्यास पित्रादिक अन्यकर्माकडे लाव

णारे यांची आज्ञा अनुल्लंघ्य नाही. ४४ आणि तो योगी प्रयत्नेंकरून यत्न करित होत्साता निष्पाप असा, अनेक जन्मेंकरून सिद्ध होउन, मोक्ष पावतो. ४५ तपस्वी म्ह० कृच्छ्रचांद्रायणादि करणारे; आणि ज्ञानी, म्ह० शास्त्रीय ज्ञानवान् कर्मी, म्ह० अग्निहोत्रादिकर्म करणारे. यां सर्वांहून योगी अतिश्रेष्ठ होय. तस्मात् हे अर्जुना तूं योगी हो. ४६ सर्व योग्यामधें जो मदर्पित अंतःकरणेंकरून भाविक होत्साता मला भजतो, तो मला अतिमान्य होय. ४७

## ॥ विज्ञानवर्णन ॥

### ॥ अध्याय ॥ ७ ॥

कृष्ण म्हणतात, हे अर्जुना, माझाठाईं चित्त ठेवून, योगातें करित होत्साता, मदाश्रित असा मला निःसंशय जा रीतीनें जाणशील तेंस

## ॥विज्ञानवर्णन॥७॥

मग ऐक. १ तें ज्ञानविज्ञान मी तुला निःशेष सांगेन. जें जाणून आणखीं दुसरें कांहीं येथें जाणायाचें राहत नाहीं. २

सहस्र मनुष्यांत एखादा पुरुष सिद्धिसाठीं यत्न करितो. आणि यत्न करणाऱ्या अशा सिद्धांत एखादा मला यथार्थ जाणतो. ३ माझी प्रकृति अष्टविध आहे. तिचे प्रकार पृथ्वी, उदक, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि, आणि अहंकार, हे होत. ४ ही प्रकृति अपर ह्म॰ जड होय. याहून श्रेष्ठ दुसरी जीवभूत प्रकृति जाण. जी या जगाचें धारण करिते. हीपर, ह्म॰ चैतन्यरूप, होय. ५ या दोन प्रकृति सर्व भूतांचे कारण होत. मी सर्व जगाचें उत्पत्तिकारण, आणि लयाचें स्थान, होय. ६ मजहून दुसरें कांहीं नाहीं. सूत्रांत मण्यासारिखा, सर्व प्रपंच माझा ठाईं प्रोत, ह्म॰ ओंविला आहे. ७ उदकाचा ठाईं मी रस

॥ विज्ञानवर्णन ॥ ७ ॥

आहें. चंद्रसूर्याचाठाईं मी प्रभा आहें. सर्व
वेदांचाठाईं मी प्रणव, ह्म० ॐकार आहें. आ
काशीं शब्द आहें. मनुष्यांचाठाईं मी पुरुषत्व
आहें. ८ पृथ्वीचा ठाईं मी सुगंध आहें. अग्नि
चाठाईं मी दहनशक्ति आहें. सर्व भूतांचाठाईं
जीवन ह्म० आयुष्य, यद्वा, अन्न मी आहें. तप
स्व्यांचाठाईं मी तप आहें. ९ हे अर्जुना सर्वभू
तांचें मी सनातन बीज होय• असें जाण, बुधि
मंताची बुधि मी आहे. तेजस्व्यांचें तेज. १० ब
लवंताचें बल, कामराग विवर्जित, असें मी आ
हें. आणि भूतांचाठाईं धर्मास विरुध न व्हे अ-
सा काम मी आहें. ११ सात्विक ह्म० ज्ञानवैरा
ग्यैश्वर्यादिक, राजस ह्म० लोभप्रवृत्यादिक,
आणि तामस ह्म० निद्रालस्यादिक, हे त्रिगुण
मय भाव मजपासून झाले असें जाण. परंतु
मी त्याचाठाईं नाहीं. ते माझाठाईं आहेत. १२
या तीन गुणमय भावनानीं हें सर्वजग मोहित

॥विज्ञानवर्णन॥७॥

होत्साते, यांहून मी वेगळा असें मला जाणत नाहीं. १३ ही प्रपंचरूप गुणमयी माझी दैवी माया दुरतिक्रम आहे. जे मजप्रतच पावतात, ते इला तरतात. १४ जांचें ज्ञान मायेनें आवृत्त. असे पापी. मूढ. आणि नराधम, ह्मः नीचमनाचे. असुरभावाप्रत राहिले होत्साते मजप्रत येत नाहींत. सारांश; माया विक्षेप; आणि आवरण, या दोन शक्तीकरून, सर्व अनर्थाचें मूळ होय. १५

हे अर्जुना पीडित ज्ञानेच्छु. अर्थार्थी, आणि ज्ञानी. असे चतुर्विध पुण्यवान् लोक मला भजतात. १६ त्यांत ज्ञानी नित्ययुक्त तसाच एकभक्ति ह्मणून विशिष्ट होय. ज्ञान्यास मी अत्यंत प्रिय आहे, आणि तो मला प्रिय आहे. १७ हे सर्व चतुर्विध भक्त श्रेष्ठच होत. परंतु ज्ञान्यास मी माझा आत्मा असें मानितों. कां कीं तो माझाठाईं समाहितचित्त होत्साता. सर्वो

॥ विज्ञानवर्णन ॥ ७ ॥

त्कृष्टगतिरूप अशा मला मत्प्राप्त्यर्थच भज
तो. १८ बहुजन्मानीं सर्वांचाठाईं वासुदेव
आहे अशा ज्ञानेंकरून संपन्न होत्साता, म
जप्रत पावतो. असा ज्ञानवान् अति दुर्लभ
होय. १९ ज्याचें ज्ञान नानाप्रकारचा मनोरथें
करून गेलें, अशे स्वभाव बद्धपुरुष, त्यात्या
मनोरथांचे दाते अशा देवांच्या आराधनेसवि
हित, तेते नियम आचरून, त्यात्या देवतांप्रत
पावताहेत. २० जोजो भक्त भावेंकरून, ज्याज्या
देवतेस पूजायास इच्छितो, त्याचा त्याचा त्या
श्रद्धेस मीच अचल करितों. २१ तो त्या श्र-
द्धेनें युक्त होत्साता, त्या देवतेस प्रसन्न करितो.
आणि परिणामीं मीच अर्पिले अशा इष्ट
मनोरथांतें पावतो. २२ परंतु अशा अल्पबु
द्धीस अशाश्वत फळ होतें. देवभक्त देवांप्रत
जातात. माझे भक्त मात्र मजप्रत पावतात.
२३ माझ्या सर्वोत्तम अशा परतत्वास नजा-

## ॥विज्ञानवर्णन॥७॥

णत होत्साते मूढ निराकार अशा मला साका
र मानितात. २४ मी सर्वांस अस्पष्ट आहे.
कांकीं मी योगमायेनें आच्छादित आहें. मूढ
लोक मी जन्ममरणशून्य आहें असें जाण-
त नाहींत. २५ हे अर्जुना भूत, भविष्य, वर्त्त
मान भूतांस, मी जाणतों. परंतु मला कोणी
जाणत नाहीं. २६ इच्छा, आणि द्वेष, यां पा
सून उत्पन्न अशा द्वंद्वमोहेंकरून सृष्टींत
सर्व भूतांच्या बुध्धिमोह पावतात. २७ जास
न्मार्गस्थजनाचें पापनाश पावलें आहे, तेत्या
द्वंद्वमोहापासून मुक्त होत्साते, दृढव्रत धरू
न, मला भजताहेत. २८ जे जरामरणापा-
सून मुक्त व्हावयाकरितां, मला आश्रय करू
न, यत्न करितात, ते परब्रह्मजाणतात, आ
णि संपूर्ण अध्यात्म, म्हणजे त्वंपदार्थजीव, आ
णि सर्वकर्म, म्ह० तत्त्वंपदार्थांच्या ज्ञानाचे सा
धन भूत, अशे सर्वस्वधर्म. यांस जाणतात.

॥ विज्ञानवर्णन ॥ ७ ॥

२९ अधिभूत, अधिदेव, आणि अधियज्ञ, यांसहित अशा मला जे उपासितात ते मरणकालींही मातें स्मरतात. ३०

---

## ॥ पुरुषोत्तमयोग ॥

॥ अध्याय ॥ ८ ॥

अर्जुन प्रश्न करितो. हे पुरुषोत्तम. ब्रह्म तें काय ? अध्यात्म काय ? कर्म तें काय ? अधिभूत कशाला ह्मणतात ? अधिदेव काय ? या देहांत अधियज्ञ कोण ? आणि तो जाणावा कसा ? जितचित्त पुरुषानीं अंतकालीं तुला जाणावा कसा ? २

कृष्ण सांगतात. जें अविनाशि, आणि परम, ह्मणजे श्रेष्ठ तें ब्रह्म होय. अध्यात्म ह्मणजे स्वभावभूताचा सा[illegible] स्वभाव आणि उत्पत्ति यांचें कारण, अशा द्रव्ययुक्त यज्ञादि क्रियांस कर्म ह्मणतात. ३ अधिभूत,

## ॥ पुरुषोत्तमयोग ॥ ८ ॥

ह्म० क्षरभाव*, अधिदैव ह्म० सर्वदेहांत राहणारा सर्वदेवतात्मा हिरण्यगर्भजो तो होय. अधियज्ञ, ह्म० यज्ञाभिमानी विष्णु, तोसर्वांचा देहांत मीच होय. ४ अंतकालीं मलाच स्मरत होत्साता कलेवरातें ह्म० देहातें टाकून जो प्रयाण करितो, तो निःसंशय मजप्रत पावतो. ५ सारांश निरंतर जीजी भावना असते, तीती अंतकालीं होते. आणि कलेवर त्यागानंतर तदनुरूप परिणाम पावतो. ६ यास्तव तूं सर्व काल माझेंच स्मरण कर, आणि युध्द कर. तुझें मन आणि बुद्धि माझाठाईं ठेव, ह्मणजे तूं निःसंशय मजप्रत पावशील. ७ जो मनुष्य अभ्यासयोगयुक्त, आणि अनन्यगामिचित्तें करून दिव्य अशा परमपुरुषातें निरंतर चिंतितो, तो त्याप्रत पावतो. ८ प्रयाणकालीं अचल मनेंकरून भक्तिआणि योगबल यांहीकरून युक्त होत्साता, भ्रुकुटीचामधें प्राणातें स

---

*. पंचमहाभूतें.

म्य करून जो सर्वज्ञ, पुराण, जगाचा अंतर्या
मी सूक्ष्माहून सूक्ष्म, सर्वांचा धाता, अचिंत्य
रूप, आदित्यवर्ण, अविद्येहून पराचीन, अशा
पुरुषातें स्मरतो, तो त्या परपुरुषाप्रत पाव
तो. १०

आतां ज्यास वेदवेत्ते अक्षर बोलतात, ज्या
च्याठाईं रागरहित सन्यासी प्रवेश करितात,
आणि ज्यातें इच्छिणारे ब्रह्मचर्यातें धारण क
रितात, त्या पदाची मी तुला थोडक्यांत वळ-
ख करून देईन. ११ सर्व इंद्रियांचा निग्रह करू
न, आणि हृदयीं मनाचा निरोध करून आप
ला प्राण मूर्धस्थानीं ब्र० भ्रुकुटीच्या मध्यभा
गीं ठेवून, योग धारणेच्याठाईं राहिला असा.
१२ ॐम् अशा एकाक्षर ब्रह्मातें स्मरणपूर्वक
उच्चारित होत्साता जो देहत्याग करितो, तो प-
रमगतीप्रत पावतो. १३ जो अनन्यचित्त नि
रंतर मला स्मरितो, त्या नित्ययुक्त योग्यास

॥पुरुषोत्तमयोग॥८॥

मी सुलभ आहें. १४ महात्मेपुरुष याप्रकारें
परम सिद्धीप्रत पावलेहोत्साते मजप्रत ये
तात, तेपुनः दुःखालय अशाजन्मातें पावत
नाहींत. १५ हे अर्जुना, ब्रह्मभुवनासहवर्तमा
न सर्वलोकांपासून पुनरावृत्ति होते. परंतु
जो मजप्रत पावतो, त्यासपुनर्जन्म नाहीं. १६
तेप्रसिध्अहोरात्र वेत्तेजन, ब्रह्मदेवाचा दिवस
सहस्र चौकड्या पर्यंत, आणि तसीच रात्रि
ही सहस्रयुगचतुष्टयावधि असें जाणतात.
१७ तोदिवस प्राप्तजहाला ह्मणजे सर्वव्यक्ति
अव्यक्तापासून होतात. आणि ती रात्रि प्राप्त
झालीह्मणजे सर्वअव्यक्ती लीन होतात. १८
हा भूतसमूह परवश ह्म० अविद्या काम क
र्माधीन होत्साता पुनःपुनः दिवससमयीं हो
ऊन रात्रिसमयीं लीन होतो. १९ जो सर्वभू
त समूह लयीं नाश पावत नाहीं, तोपर, आ
णि व्यक्तीपासून वेगळ्या भावाचा होय. तोअ

॥ पुरुषोत्तमयोग ॥ ८ ॥

व्यक्त, आणि सनातन आहे. २० जास अव्यक्त आणि अक्षर असें ह्मणतात त्यासच परमगति ह्मणतात. जाप्रत पावोन पुनः निवृत्त होत नाहीत. असें तें माझें परम धाम होय. २१ तो परमपुरुष अनन्य भक्तीकरून लभ्य होय. भूतें जांचा अंतःस्थ होत, आणि जांचा हा सर्व प्रसार होय. २२

आतां योगी जाकाळीं गलें असतां आवृत्ति, आणि जाकाळीं गेले असतां अनावृत्ति पावतात, त्याकाळातें मी तुला सांगेन.

ब्रह्मवेत्ते जन अग्निज्योति, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायण, यांचा देवतां ठायी प्रयाण करित होत्साते ब्रह्माप्रत पावतात. २४ योगी ह्म० कर्मी, धूमरात्रि, कृष्णपक्ष, दक्षिणायन. यांचा देवतांचा ठाया प्रयोग करित होत्साता चांद्रमस ज्योतीप्रत जावून निवृत्त होतो. २५ या शुक्ल, आणि कृष्ण, दोन जगाचा शा

श्वेत गति अशा मान्य आहेत. प्रथम गतीनें पुनरावृत्ति होत नाहीं- दुसरीनें पुनर्जन्म होतें. २६ या दोन गति जाणत होत्साता योगी मोह पावत नाहीं. तस्मात् हे अर्जुना, तूं सार्वकाल योगयुक्त हो. २७ योगी हें जाणून वेदाध्ययन, यज्ञानुष्ठान, आणि तपदान, यानें जें पुण्य फल शास्त्रांत वर्णिलें आहे, त्या सर्वांस अतिक्रमितो; आणि आद्य आणि पर अशा स्थानाप्रत पावतो. २८

## ॥ राजविद्यागुह्ययोग ॥

## ॥अध्याय॥९॥

कृष्ण म्हणतात. अत्यंत गोप्य असें हें (ज्ञप्तिमात्रस्वरूप) गुणाचा ठाईं दोषाविष्करण न करणारा अशा तुला मी अनुभवसहित सांगेन: जें जाणून संसारापासून मुक्त होसील. १ तें विद्यांचा राजा, गोप्यांचा राजा, पवित्र, उत्तम प्रत्यक्षावगम, धर्म्य वस्तूस प्र

॥राजविद्याराजगुह्ययोग॥९॥

त्यक्ष दाखविणारें, धर्मयुक्त, अव्यय, आणि करायास सुलभ होय. २ या धर्मावर विश्वास न ठेवणारे पुरुष मला न पावोन, मृत्युसंसारमार्गी निवर्तताात. ३

मी माझ्या अव्यक्त स्वरूपानें हें सर्व जग व्यापिलें आहे. सर्व भूतें माझ्याठाईं भासतात- मी त्यांच्याठाईं नाहीं, ४ आणि तीं माझ्याठाईं नाहींत. हा माझा ऐश्वर योग, ह्म० माझी भूतांसहवर्त्तमान युक्ति घटना, पहा! माझा आत्मा भूतांचा धारणकर्त्ता होय- त्यांच्याठाईं आश्रित नाहीं- त्यांच्या दृष्टिकर आहे. ५ जसा सर्वव्यापक महान् वायु, आकाशीं स्थित आहे, तशीं सर्व भूतें माझ्याठाईं स्थित आहेत असें जाण. ६ हे कौंतेय कल्पक्षयीं सर्व भूतें माझ्या प्रकृतीप्रत जातात आणि कल्पाच्या आरंभीं मी त्यांस पुनः उत्पन्न करितों. ७ मी आपल्या प्रकृतीचा आश्रय करून, स्वभाववशें

करून कामक्रोधाद्यधीन अशा या भूतग्रामा स पुनःपुनः नानाविध उत्पन्न करितों. ८ तीं उत्पत्त्यादिकर्में मला बंधन करित नाहींत. कांकीं मी त्या कर्मीं उदासीनाचेपरि आसक्तिशून्य आहें. ९ माझा प्रवर्तकपणानें प्रकृति चराचरांस उत्पन्न करिते. हे कौंतेय याहेतूकरून जगभ्रमण पावतें. १०

मूढजन माझें परतत्त्व न जाणून भूतांचा महेश्वर असाही मनुष्यदेहाप्रत आश्रित जो मी त्या माझी अवज्ञा करितात. ११ ते राक्षसी, आणि आसुरी, म्ह० रजस्तमोमयी अशा मोह करणाऱ्यां प्रकृतींचा आश्रय करित होत्साते, निष्फल ज्यांचा आशा, निष्फल ज्यांचीं कर्में, निष्फल ज्यांचें ज्ञान, तसेच विवेकहीन असे होत. १२

महात्मेतर दैवी, म्ह० सत्वप्रधान अशा प्रकृतीप्रत आश्रित होत्साते, भूतांचा आदि

आणि अव्यय अशा मला जाणून मातें एकाग्रचित्तानें भजतात. १३ कोणी नित्य सावधान असे दृढव्रतें धारण करून यत्न करित होत्साते, सतत कीर्तन, नमस्कारादि द्वारा भक्ति करून मला उपासितात. १४ कित्येक ज्ञानयज्ञेंकरून यजन करित होत्साते, मला उपासितात. तसे कित्येक एकत्वें करून, पृथक्त्वें करून, बहुप्रकारें करून, विश्वतोमुख अशा मला उपासितात. १५ क्रतु, ह्म० देवता ध्यानरूप संकल्प मी; यज्ञ, ह्म० श्रौत, स्मार्त्त, देवतोद्देशें करून, द्रव्यत्याग मी; स्वधा ह्म० पितरांचें अन्न मी; औषध ह्म० मनुष्याचें अन्न मी, मंत्र मी. मीच आज्य ह्म० घृत. मी अग्नि, मी हुत. १६ या जगाचा पिता मी, माता, धाता, आणि पितामह मी, वेद्य मी, पवित्र मी, ॐकार मी, ऋग्वेद, सामवेद, आणि यजुर्वेद मी होय. १७ गति, भर्त्ता, प्रभु, साक्षी, निवास, ह्म० आश्रय, शरण, ह्म० रक्षक,

॥ राजविद्यागुह्ययोग ॥ ९ ॥

आणि एकत्व मी. प्रभव ह्म० उत्पत्तिस्थान मी; आणि लयस्थान मी. निधान मी. अव्ययबीज मी होय. १८ सूर्यरूपें करून ताप तो मी. वृष्टि मी. तीचा निग्रह आणि उत्सर्जन मीच करितों. अमृत ह्म० जीवन. आणि मृत्यु मी. सत् मी, तसें असत् मी होय. १९

तीन वेद विद्या जाणणारे, आणि सोमपान करणारे, पापरहित होत्साते. यज्ञें करून यजन करून मजप्रत स्वर्गगतीतें प्रार्थितात. तें पुण्य अशा इंद्रलोकाप्रत पावोन स्वर्गी दिव्य देवभोगातें भोगितात. २० ते त्या विशाल स्वर्गलोकास भोगून पुण्याचा क्षय झाला. ह्म० मृत्युलोकाप्रत पुनः पावतात. याप्रकारें विषयकामुक पुरुष, वेदत्रयीमधें उक्त असा हा धर्म ह्म० काम्ययज्ञ त्याप्रत अनुसरतात. त्यांचा मागें जाणें येणें लागतें. २१ जे अनन्यपणें चिंतित होत्साते मला उपासितात, त्यानि

॥ राजविद्यागुह्ययोग ॥ ९ ॥

त्य भक्तांचें योगक्षेम ह्म० सर्वकृत्यभार मी वा
हतों. जे अन्यदेवतांची सेवा श्रद्धेकरून करिता
त, त्यासही माझीच सेवा त्यांत घडते-ती विधि
पूर्वकमात्र घडत नाहीं. २३ मीच सर्वयज्ञाचा भो
क्ता आणि फलदाता होय. जन मला यथार्थजाण
त नाहींत ह्मणूनच्यवतात. देवव्रत ह्म० इंद्रादिदे
वार्चक देवांप्रत जातात: पितृव्रत पितरांप्रतजाता
त, पिशाचयाजक पिशाचांप्रत जातात; आणिम
द्याजक मजप्रत पावतात. २५

पत्र, पुष्प, फल, जल, यांतें जो जितात्मा
मला भक्तिपूर्वक अर्पितो. त्याचें तें भक्तीनेंअ
र्पिलेलें मी स्वीकारितों. २६ हे अर्जुना, तूं जें का
य करितोस, भक्षितोस, होमितोस, देतोस,
आणि तपतोस, तें सर्व मदर्पण कर. २७ ह्मण
जे शुभाशुभ फलदेणाऱ्या अशा कर्मबंधनें
करून मुक्त होसील; आणि सन्यास योगीं
समाहितचित्त होत्साता, मजप्रत पावशील.

॥पुरुषोत्तमयोग॥९॥

२८ मी सर्वभूतीं समान आहें. मला कोणी द्वेष्य, तसा प्रिय नाहीं. परंतु मला जे भक्तिपूर्वक भजतात, ते माझाठाईं आहेत, आणि मी त्याचाठाईं आहें. २९ कोणी कितीकां दुराचार असेना, जर तो मला अनन्यभावेंकरून भजतो, तर तो साधूच मानावा. त्याचा तो निश्चय उत्तमप्रकारचा होय. ३० तो शीघ्र धर्मात्मा होतो, आणि शाश्वत शांतीतें पावतो. हे कौंतेय, तूं पक्कें जाणकीं माझा भक्त नाश पावत नाहीं. ३१ जे पापयोनि स्त्री, वैश्य, शूद्र, तेही मला आश्रय करून परगतीप्रत पावताहेत. ३२ मग भक्त, आणि पुण्य, ह्म० पवित्र असे ब्राह्मण, तसे राजर्षि पावतील हें काय सांगावें. हा लोक अनित्य, आणि असुख आहे, असा विचार करून मला भज. ३३ मच्चित्त, माझा भक्त, मत्प्रीत्यर्थ यजन करणारा हो; आणि मला नमस्कार कर. असा योग करून, मत्परायण होत्साता आत्मा अशा मज

अत पाव सील. ३४

---

## ॥ विभूतियोग ॥

## ॥ अध्याय ॥ १० ॥

कृष्ण ह्मणतात. हे महाबाहो, पुनः माझें उत्तम वचन ऐक. जें आदरयुक्त जो तूं त्या तुझें हित व्हावें या इच्छेनें तुला मी सांगेन. १

सुरगण, तसेंच महर्षि, माझा ऐश्वर्यातें जाणत नाहींत. कारण कीं मी सर्व देवांचा तसा च महर्षींचा आदि होय. २ सर्व लोकांचा महेश्वर, ह्म० परमेश्वर, आणि कारणशून्य, अतएव जन्मातीत, असें मला जो पुरुष जाणतो, तो मनुष्यांत ज्ञाताः तोच सर्व पापापासून मुक्त होतो. ३ बुद्धि, ज्ञान, असंमोह, क्षमा, सत्य, दम, शम, सुखदुःख, भव, ह्म० उत्पत्ति, भाव, ह्म० सत्ता, भय, अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अयश, असे प्रथक् प्रकारचे मनोभाव भूतांस मजपासून होतात. ५ प्राचीन भृग्वादि सप्तर्षि, आ

णि तसेंच सनक, सनंदन, सनातन, सनत्कु-
जात, हे चार महर्षि; आणि स्वायंभुवादिक चतु
र्दश मनु, हे सर्व ( हिरण्यगर्भरूप ) अशामा
झ्या मनापासून झाले ( ते माझ्यागाई निष्टावान्
होत ) त्यांपासून लोक, आणि या स्थावर जंग
मादिक प्रजा उत्पन्न झाल्या आहेत. ६ ही मा
झी विभूति, आणि योग, यांस जो तत्वें करून
जाणतो तो निर्विकल्प समाधियुक्त होतो. ७
मीं सर्वांचा प्रभव, मजपासून सर्व उत्पन्न होतें.
असें मानून भावनायुक्त ज्ञानी मला भजता
त. ८ ते मच्चित्त तसे मद्गत प्राण असे परस्प-
रांस बोधवित होत्साते, आणि माझेंच कथन क
रित होत्साते, आपआपल्यांत संतोष पावता
त. आणि रमतात. ९ जे माझ्या सेवेस निरंत
र लागतात, त्यांस मी प्रीतिपूर्वक त्या बुद्धियो
गातें देतों. जाणेंकरून ते मजप्रत पावतात.
१० आणि मी कृपाळुपणानें, आत्मभावीं स्थि

॥ विभूतियोग ॥ ९ ॥

त असा ज्ञानदीपेंकरून त्यांचा अज्ञानजनि
त तमाचा नाश करितों. ११

अर्जुन प्रश्नकरितो. तूं परब्रह्म, परधाम, प
रम पवित्र वस्तु होस. सर्व ऋषि, देवर्षि, नारद,
असित, देवल, व्यास, हे तुला, आदिदेव जन्मा
तीत, व्यापक, दिव्य, शाश्वतपुरुष, असें ह्मण
तात. १३ आणि तूंही मला तसेंच सांगतोस.
हे केशवा, हें सर्वजें मजप्रत बोलतोस, तें मी
सत्य मानितों. तुझा व्यक्तीतें देव जाणत नाहीं
त. तसेंच दानव जाणत नाहींत. १४ हे भू
त भावन, हे भूतेश, हे देवदेव, हे जगत्पते, तूं
स्वयें आपण आपणास जाणतोस. १५ तर
जा विभूतीकरून तूं या लोकांस व्यापून राह
तोस, त्या तुझा दिव्य विभूतीलें तूंच अशेषेंक
रून सांगायास योग्य आहेस. १६ हे योगि
न्, मी तुझें निरंतर चिंतन करित असतां तुला
कसें जाणावें? कोणकोणत्या पदार्थीं मी तुझें

चिंतन करावें ? १७ तूं आपला योग आणि वि
भूति, ह्म० ध्यानावलंबन भूत. आकृतिभेद वि
स्तरेंकरून पुनः सांग. कांकीं तुझ्या वचनामृ
त प्राशनेंकनून मला अद्यापि तृप्ति होत नाहीं.

कृष्ण ह्मणतात फार चांगलें तर बापा!
हे कुरुश्रेष्ठ, दिव्य अशा माझ्या विभूति मुख्य
त्वेंकरून मी तुला सांगेन. माझ्या विस्तारास
अंत नाहीं. १९

सर्वभूतांच्या हृदयीं स्थित असा जो आ-
त्मा तो मी. भूतांचें जन्म स्थिति कारण, तसें
लयस्थान मी होय. २० सूर्यामधें मी विष्णु
आहें. ज्योतीमधें मी अंशुमान् असा रवि होय.
मरुतामधें मी मरीचि. आणि नक्षत्रांत मी चंद्र
होय. २१ वेदांत सामवेद मी. आणि देवांत इं-
द्र मी आहें. इंद्रियांत मन मी. आणि भूतां
ची चेतना मी होय. २२ रुद्रांत शंकर मी; आ
णि यक्षराक्षसांत कुबेर मी होय. वसूंत पाव

॥विभूतियोग॥१०॥

क मी. पर्वतांत मेरू जो तो मी आहें. २३ पुरो
हितांत मुख्यपुरोहित बृहस्पति मला जाण.
मी सेनापतींत स्कंद. तसा जलाशयांत सा-
गर मी होय. २४ महर्षींत मी भृगु. वाणींत ए
काक्षर म्ह० ॐकार मी. यज्ञांत जपयज्ञ मी;
आणि स्थावरांत हिमालय मी आहें. २५ त
सा सर्व वृक्षांत अश्वत्थ, आणि देवर्षींमधें ना
रद मी होय. गंधर्वांत चित्ररथ, तसा सिद्धांत
कपिलमुनि मी आहें. २६ अश्वांत अमृतम
थनसमयीं झाला असा उच्चैःश्रवा मला जाण.
गजेंद्रांत ऐरावत, आणि मनुष्यांत राजा मी.
असें जाण. २७ आयुधांत वज्र, आणि धेनूंत
कामधेनु मी आहें. उत्पत्तिकर्त्ता असा जो का
म तो मी होय. सर्पांत वासुकी, तसा नागांत,
अनंत, जलचरांत वरुण, आणि पितरांत अ
र्यमा मी होय. नियमन करणारांत यम मी. २९ दै
त्यांत प्रल्हाद मी; कलन करणारांत काल मी. मृ

गांत सिंह; आणि पक्ष्यांत गरुड मीजाण. ३०
वेगवंतांत वायु मी आहें. शस्त्रधरांमधें दाश
रथिराम मी. झषांत ह्म० मत्स्यादिकांत मकर
मी आहें. नदींत जाह्नवी ह्म० भागीरथी मी. ३१
भौतिकांचा आदिमध्य आणि अंत मी आहें.
विद्यांत अध्यात्मविद्या; आणि भाषणांत वा
द मी. ३२ अक्षरांत अकार; तसा समास स-
मुदायांत द्वंद्व मी आहें. आणिखी अविनाशी
काल ही मीच होय. तसाच धाता, ह्म० कर्मफ
लप्रद. आणि विश्वतोमुख असा मी आहें. ३३
सर्व हरण करणार असा मृत्यु मी. पुढें होणा
रांचा उद्भव मी. नारींत कीर्ति, श्री, वाणी, स्मृ
ति, मेधा, धृति, क्षमा, मी होय. ३४ सामांत बृ
हत्साम; आणि छंदांत गायत्री मी होय. मा
सांत मार्गशीर्ष; तसा ऋतूंत वसंत मी. ३५
कपटकृतींत द्यूत मी. तेजस्व्याचें तेज मी.

---

अथवा पवित्र कर्त्यांत

॥ विभूतियोग ॥ १० ॥

जय आणि व्यवसाय + मी. सात्विकांचें सत्व मी. ३६ वृष्णींत वासुदेव, आणि पांडवांत धनंजय, (अर्जुन) मी होय. मुनींत व्यास. आणि कवींत उशना (शुक्र) कवि मी आहें. ३७ दमनकर्त्यांचा दंड मी; आणि जयेच्छावंतांची नीति मी, गुह्यांत मौन मी; आणि ज्ञानवंतांचें ज्ञान मी. ३८ तसेंच अर्जुना, सर्व भूतांचें बीज मी होय. मजवांचून चराचर भूत नाहीं. ३९ माझ्या दिव्य विभूतींचा अंत नाहीं. ह्या विभूतींचा विस्तार मी एकदेशें करून सांगितला. ४० जेंजें भूत ऐश्वर्ययुक्त, आणि श्रीमत्, आणि बलयुक्त, तेंतें माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न असें जाण. ४१ परंतु अर्जुना, तुला हें बहु ज्ञान कशास. मी एकांशें करून या जगातें व्यापून राहिलों आहें. ४२

---

+ उद्यम किंवा निश्चय.

## ॥ विश्वरूपदर्शन ॥

### ॥ अध्याय ॥ ११ ॥

अर्जुन ह्मणतो, माझा अनुग्रहार्थ परम गुह्य असें अध्यात्म संज्ञितजें वचन तूं सांगीतलें त्याणें करून माझा मोह गेला. १ हे कमलपत्राक्ष, तुजपासून भूतांचे सृष्टि संहार मी विस्तरशः ऐकिले. आणि अव्यय असें तुझें माहात्म्य ही ऐकिलें. २ हे परमेश्वर, आपण जगदाधार, असें तूं सांगतोस, हें सत्य होय. हे पुरुषोत्तम, आतां मी तुझें ऐश्वररूप पाहूं इच्छितों. ३ यास्तव मी तें पहावयास शक्त आहें, असें जर मानितोस, तर त्या तुझा अव्ययरूपास मला दाखीव. ४

कृष्ण बोलतात, तर पार्था माझीं शतशः सहस्रशः नानाविध, दिव्य, नानावर्ण, नानाकृति, अशीं रूपें पहा. ५ आदित्य, वसु, रुद्र, अश्विनीकुमार, तसेच मरुत्, यांस पहा—पूर्वी कधीं पाहिलीं नाहीं, अशीं आश्चर्यें पहा. ६

## ॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

अर्जुना, या माझा देहीं सर्व स्थावर, जंगम, जग, एकावयवीं स्थित असें आज पहा. आणखी त्याहून अन्य जें पाहूं इच्छितोस तें सर्व पहा. ७ परंतु या तुझा चर्मचक्षूकरून तूं मला पाहण्यास शक्त नव्हेस. यास्तव मी तुला दिव्यचक्षू देतों, त्याणें करून हा माझा ऐश्वर योग पाहा. ८

संजय सांगतात, हे राजन्, असें बोलून महा योगेश्वर असा हरि, अर्जुनास परमेश्वर रूप दाखविता झाला. ९ जा रूपाच्याठायीं अनेक मुखें, तसीं नयनें, तसींच अद्भुत दर्शनें, आणि दिव्य भूषणें, आणि दिव्य उद्यत आयुधें. १० जें रूप दिव्यपुष्पें, तसीं वस्त्रें याहीं करून सुशोभित, आणि दिव्य गंधें करून अनुलिप्त, सर्वाश्चर्यमय, देव, अनंत, आणि विश्वतोमुख होय. ११ जर आकाशीं सहस्त्र सूर्यांची कांती एकदांच प्रकटेल, तर ती त्या

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

महात्म्याचा कांतीस उपमा साजेल. १२ त्यादेवदेवांचा शरीरीं अर्जुन त्या समयीं, अनेक प्रकारें विभक्त असें, सर्व जग पाहता झाला. १३ त्यानंतर तो विस्मित, आणि ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत, असा मस्तकें करून, देवास नमस्कार करून, हात जोडून बोलता जहाला.

हे देव, तुझा देहीं देव, आणि भूतविशेषांचे समुदाय, तसा कमलासनस्थ ब्रह्मा, ईश, सर्व ऋषि, दिव्य उरग यांनें पाहतों. १५ तुला मी सर्वत्र अनंतरूप, आणि अनेक बाहु, तसीं उदरें, नेत्रें, आणि वक्त्रें, याहींकरून युक्त पाहतो. परंतु तुझा आदि, अंत, आणि मध्य, मला दिसत नाहीं. हे विश्वेश्वर, विश्वरूप, तुला किरीट, गदा, चक्रधारी, आणि तेजांचा राशी, सर्वतः दीप्तियुक्त, आणि दुर्निरीक्ष्य, तसा प्रदीप्त. अग्नि. आणि सूर्य, यांसीं तुल्य कांति, आणि अप्रमेय असा पाहतों १७ जाणायास योग्य,

## ॥विश्वरूपदर्शन॥११॥

असें परम अक्षर तूं आहेस. तूं या विश्वाचें पर
निधान होस. तूं शाश्वत धर्माचा रक्षक होस.
तुला सनातन, तसा अव्यय, मी मानितों. १८
आदिमध्यांत रहित, अनंतवीर्य, अनंतबाहु, त
सा चंद्रसूर्यनेत्र, प्रदीप्ताग्नि मुख, आणि स्वते
जें करून या विश्वास तापविणारा असा तुला
मी पाहतों. १९ स्वर्ग पृथ्वींचें मध्य, आणि सर्व
दिशा तूं एकत्यानें व्याप्त आहेत. हे महात्मन्,
अद्भुत आणि उग्र असें हें तुझें रूप पाहून तीन
हीलोक प्रकर्षेकरून व्यथा पावेल. २० हे दैत्यां
श दुर्योधनादिक तुजप्रत प्रवेश करिताहेत. कि
तीएक भीतहोत्साते प्रांजलि म्ह॰ बद्धांजलि हो
ऊन तुज स्तविताहेत. महर्षींचे आणि सिद्धांचे
समुदाय स्वस्ति असें बोलून अनेक स्तुती क
रून तुला स्तविताहेत. २१ रुद्र, आदित्य, वसु,
आणि साध्य, तसे विश्व संज्ञक देव, अश्विनी
कुमार, मरुत्, उष्मप, गंधर्व, यक्ष, असुर,

## ॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

सिध, यांचे समुदाय विस्मितहोत्साते, सर्वतु
ला पाहताहेत. २२ हे महाबाहो, महत्, दंष्ट्रा
कराल, अनंतमुखें, नेत्रें, भुज, उरु, चरण, उ
दरें, यांहींकरून युक्त अशा तुझा रूपास पाहू
न लोक मज सारिखे प्रकर्षेकरून व्यथित
झाले आहेत. २३ याप्रकारें मी तुला आका-
श व्यापी, तसा दीप्त, अनेकवर्ण, आणि विस्ता
रित मुख, दीप्तविशाल नेत्र, असा प्रत्यक्षपा
हून असतां माझें चित्त प्रव्यथित झालें आहे
माझें धैर्य मला सोडितें, मी शांतीतें पावतना
हीं. २४ दंष्ट्रा म्ह० दाढा यांहींकरून भयंकर,
आणि कालाग्नितुल्य अशा तुझा वदनांस, पा
हून मला दिशा समजत नाहींत. आणि मला
स्वास्थ्य होत नाहींतर, हे देवाधिदेव, हे जगन्नि
वास, प्रसन्न हो. २५ हे धृतराष्ट्राचे पुत्र. राज-
समुदायांसहवर्तमान, आणि भीष्म, द्रोण, त
सा कर्ण, हेही आमचा मुख्य योध्यांसुद्धां दं

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

क्राकराल, आणि भयानक अशा तुझा मुखां
प्रत त्वरित प्रवेश करिताहेत. कित्तीएक तुझा
दंतांचा मध्यभागीं चूर्णित मस्तक असे दिस
ताहेत. २७ जसे नदींचा उदकाचे प्रवाह समु
द्राप्रत अभिमुख होत्साते जाताहेत, तद्वत् हे
नरलोकवीर. जाज्वल्यमान अशा तुझा मुखां
प्रत प्रवेश करिताहेत. २८ जसे पतंग समृद्धवे
गंहोत्साते प्रदीप्त अग्नीप्रत नाशार्थ प्रवेश
करितात, तसेलोक समृधवेगेंकरून तुझा मु
खांप्रत नाशाकरितां शिरताहेत. २९ तूं प्रदीप्त
मुखेंकरूनआसमंतात् ग्रासित होत्साता, सर्वलो
कातें अतिशयेंकरून आस्वादितोस. हे विष्णो,
तुझा उग्रकांति, तेजेंकरून सर्वजगास पूर्णक
रून अत्यंत तापताहेत. ३० हे देवश्रेष्ठ, तुला
नमस्कार असो. प्रसादकर. आणि सांग कींतूं,
असाउग्ररूप कोण आहेस. आद्य अशा तुला
मी जाणूं इच्छितों. तुझीही प्रवृत्ति किमर्थ आ

## ॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

हे हें मी जाणत नाहीं· ३१

कृष्ण सांगतात, मी या लोकांचा क्षय कर्त्ता महान्, असा काल येथें आपले समोर जे सर्व उभे आहेत, त्यांस एकदांच ग्रासायास प्रवर्तलों आहें· यास्तव जे शत्रु सैन्यांत योधे स्थित आहेत, ते सर्व तुजवांचूनही मरण पावतील· ३२ तस्मात् तूं युद्धास ऊठ, यश घे, शत्रूंस जिंक, आणि समृद्ध ह्म० संपत्तियुक्त राज्य भोग· ते शत्रु मीच यापूर्वीच मारिले आहेत. हे सव्यसाचिन्, तूं निमित्त मात्र हो, भय पावूं नको· ३३ द्रोण, भीष्म, आणि जयद्रथ, तसा कर्ण, तसेच अन्यही योध वीर मी मारिले आहेत, त्यांस तूं जिंक, युद्ध कर, ह्मणजे तूं रणांत शत्रूंस जिंकिशील· ३४

संजय सांगतात- हें कृष्णाचें भाषण ऐकून, अर्जुन अति भीत असा कांपत होत्साता, कृतांजलि होऊन, नमस्कार करून, कृष्णाप्रत

## ॥विश्वरूपदर्शन॥११॥

पुनः सगद्गद बोलता जहाला. ३५

हे हृषीकेशा, तुझी कीर्तिकरून जग हर्ष पावतें, आणि तुझ्या सेवेंत रंजतें. राक्षस भयानें होत्साते दिशोदिशीं पळताहेत. सिद्ध संघ तुला नमिताहेत. ३६ हें युक्त होय. थोरांहून थोर, आणि ब्रह्म्याचा आदिकर्त्ता, अशा तुला तेकां वंदन करणार नाहींत? हे अनंत! हे देवेशा! हे जगन्निवास! तूं अक्षर, ह्म० शुद्ध ब्रह्म, होस. जें ब्रह्म सद्रूप, आणि असद्रूप, तसें [illegible] तूं यांहून पर होय. ३७ तूं आदिदेव, आणि पुराणपुरुष होस. तूं या विश्वाचें परनिधान होस. ज्ञाता, आणि ज्ञेय. तूं परधाम, ह्म० आश्रय, तूं होस. हे अनंतरूप, हें विश्व तूं व्यापिलें आहे. ३८ वायु तूं, यम तूं, अग्नि तूं, वरुण तूं, चंद्र आणि प्रजापति तूं, प्रपितामह ह्म० ब्रह्मदेवाचा पिता तूं होस. तुला सहस्त्रवार नमोनमः पुनः पुनः तुला नमस्कार असो. ३९ तुला पुरोभा-

गीं, आणि पृष्ठभागीं नमस्कार असो- तुला सर्वत्र नमस्कार असो. हे अनंतवीर्य, तूं अपरिमित पराक्रम होस. आणि सर्वव्यापी ह्मणोन सर्वरूप होस. ४० तुझा महिमा न जाणून, तुला मी सखा असें मानून, प्रमादें करून, अथवा स्नेहें करून, हटानें हे कृष्णा! हे यादवा! हे सख्या! असें बोलिलों. ४१ आणि क्रीडा, शयन, तसेंच आसन, भोजन, यांच्या ठायीं एकांतीं किंवा मंडळींत जो उपहासार्थ असत्कार केला, त्याची अप्रमेय अशा तुजप्रत मी क्षमापना करितों. ४२

- तूं या चराचर लोकांचा पिता आहेस, आणि यास पूज्य, तसा याचा श्रेष्ठ, गुरु होस. या लोकत्रयांत तुला समान कोणी नाहीं, मग अधिक कोठून असणार? तूं अप्रतिम प्रभाव होस. ४३ तस्मात् मी देहातें भूमीच्या ठायीं धरून दंडवत् नमस्कार करून ईश्वरा स्तुत्या तुझा प्रसाद मागतों. पिता पुत्राचें, प्रिय प्रियेचें, सखा

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

सख्याचें जसें साहातो, तसें तूं माझें साहावें. ४४ कधींही पाहिलें नव्हतें, ते विलोकून मी हर्ष पावलों, आणि रवीं भयेंकरून माझें मन फार व्यथा पावलें आहे. यास्तव हे देवेशा! हे जगन्निवास! दया कर, आणि तुझें देवरूप मला दाखिव. ४५ शिरीं किरीटास, आणि हातीं गदा चक्रांस, धरणार असा मी तुला पाहूं इच्छितों. हे सहस्त्रबाहो, हे विश्वमूर्त्ते, तर त्या चतुर्भुज स्वरूपाचें धारण कर. ४६

कृष्ण ह्मणतात – हे अर्जुना, मी प्रसन्न होवून, आत्मसामर्थ्येंकरून, तेजोमय, तसें विश्वात्मक आणि आद्यंतरहित, असें हें माझें परमरूप तुला दाखविलें, जें तुजहून अन्यानें पूर्वीं पाहिलें नव्हतें. ४७ हे कुरुकुलींचा वीरा, तुजवांचूनअन्यास या नृलोकीं वेदयज्ञ यांचा अधिगम, आणि दानें, आणि क्रिया, तसीं उग्रतपें, यांहींकरून माझें असें दर्शन दुर्लभ होय. ४८ या माझा

## ॥ विश्वरूपदर्शन ॥११॥

घोर रूपास पाहून तूं व्यथा पावूं नको. भयरहित आणि संतुष्टचित्त होऊन पुनः हें माझें यथापूर्वरूप पाहा. ४९

संजय सांगतात – वासुदेव असें अर्जुनाप्रत भाषण करून, आपलें पूर्ववत् रूप त्यास दाखविता झाला. याप्रकारें त्या महात्म्यानें सौम्य शरीर धारण करून, भीत अशा अर्जुनाचें आश्वासन केलें. ५०

अर्जुन ह्मणतो – हे जनार्दन, तुझा सौम्य अशाया मानुष रूपास पाहून आता मीं सचेता ह्म॰-स्थिरचित्त होत्साता प्रकृतीवर आलों. ५१

कृष्ण ह्मणतात – जें माझें अत्यंत दुर्दर्श, असें अद्भुतरूप त्वां पाहिलें, त्या रूपाचादर्शनाविषयीं देवही निरंतर इच्छा करितात. ५२ जसा तूं मला पाहता झालास, तसा मी वेदें करून, तपें करून, दानें करून, यज्ञें करूनही, पाहिला जाणार नाहीं. ५३ परंतु मी अनन्य भ

च्छीकरून मात्र तत्त्वेंकरून जाणायास आणि पाहावयास आणि प्रवेश करायास शक्य होय. ५४ जो पुरुष मत्प्रीत्यर्थ कर्में करितो, आणि जो मला पर मानितो, आणि माझीच भक्ति करितो, जो संगवर्जित, तसाच सर्वभूतीं वैररहित, तो मजप्रत पावतो. ५५

---

## ॥भक्तियोग॥

## ॥अध्याय॥ १२॥

अर्जुन प्रश्न करितो-याप्रकारें जे योगाच्याठायीं सततयुक्त भक्त, त्यांत श्रेष्ठ योगवेत्ते कोण? सगुणोपासक, कीं निर्गुणोपासक? १

कृष्ण सांगतात-जे नित्ययुक्त माझाठायीं मन ठेवून माझी उपासना करितात, ते मला अत्यंत युक्त वाटतात. २ जे सर्वभूतांच्या हितीं रत, आणि इंद्रियसमुदायास नियमून, सर्वत्र समबुद्धि होत्साते, अक्षर, तसा अनिर्देश्य, आणि

## ॥ भक्तियोग ॥ १२ ॥

अव्यक्त, तसा सर्वव्यापक, आणि अचिंत्य, आणि कूटस्थ, अचल, तसा ध्रुव, अशा माझी उपासना करितात, तेही मजप्रतच पावताहेत. ४ परंतु जांचीं चित्तें अव्यक्तीं आसक्त त्यांस क्लेश अतिशयेंकरून अधिक लागतो. कांकीं देहवंतांस अव्यक्तगति दुर्लभ होय. ५ मत्पर होवून सर्व कर्में माझाठाईं अर्पून, अनन्ययोगेंकरून, ध्यान करित होत्साते, मला उपासितात, अशा माझाठायीं प्रवेशित चित्त पुरुषांस, मृत्यु संसार सागरापासून, मी शीघ्र उद्धरितों. ७ तर माझाठाईंच मन ठेव, माझाठाईंच बुद्धि ठेव, ह्मणजे निःसंशय, यानंतर मजप्रत पावशील. ८ परंतु तूं एकदांच जर माझाठाईं चित्ताचें समाधान करायास अशक्त असलास, तर अभ्यासयोगें करून माझा प्राप्तीविषयीं यत्न कर. ९ जर अभ्यासीं ही असमर्थ आहेस, तर मत्प्रीत्यर्थ कर्मीं तत्पर हो. कां कीं मत्प्रीत्यर्थ कर्में करूनही सिद्धीतें पावसील.

## ॥ भक्तियोग ॥ १२ ॥

हेंहीकरण्याविषयीं जर असमर्थ आहेस, तरमा
झाठायीं अनन्य निष्ठा ठेवून, जितेंद्रिय होऊन, सर्व
कर्मफलाचा त्यागकर. ११ अभ्यासापेक्षें ज्ञान
श्रेष्ठ होय, ज्ञानाहून ध्यान विशिष्ट, ध्यानापेक्षें
कर्मफलत्याग, कांकीं त्यागानंतर मोक्ष होतो. १२

जास द्वेष नाहीं, जो सर्वभूतांचा मैत्र, तसा
करुणाशील, ममता, आणि अहंकार, याहींकरू
न रहित, जास सुखदुःखें समान, क्षमावान्, १३
संतुष्ट, आणि निरंतर योगी, तसा जितेंद्रिय, आणि
दृढनिश्चय, जाचें मन, बुद्धि, माझाठायीं, असा जो
माझा भक्त तो मला प्रियहोय. १४ जापासून लो
क उद्वेग पावत नाहीं; आणि जो लोकापासून स्व
यें उद्वेग पावत नाहीं; आणि हर्ष, मत्सर, भय, उद्वे
ग, पावत नाहीं, तो मला प्रिय होय. १५ जो निरपे
क्ष, शुद्ध, दक्ष, उदासीन, आणि व्यथाशून्य, तसा
सर्वोद्योगांचा परित्यागी, असा माझा भक्त, तोम
ला प्रिय होय. १६ जो हर्ष पावत नाहीं आणि द्वेष

करित नाहीं-जास शोक आणि कांक्षा नाहींत असा शुभाशुभांचा परित्यागी, भक्तिमान्, तो मला प्रिय होय. १७ शत्रुमित्रांचाठायीं, आणि मानापमानीं, तसा शीतउष्ण, सुखदुःखांचाठायीं सम, जो संगरहित, १८ जास निंदा, आणि स्तुति समान, तसा मौनी, आणिजें कांहीं यदृच्छालब्ध, त्याणेंकरून संतुष्ट, तसा गृहशून्य, आणि स्थिरबुद्धि, असा भक्तिमान् नर मला प्रिय होय. १९ जे भक्त श्रद्धायुक्त आणि मत्परहोत्साते या धर्मामृतास यथोक्त उपासितात, ते मला अत्यंत प्रिय होत. २०

---

## ॥क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग॥

### ॥अध्याय॥१३॥

अर्जुन प्रश्नकरितो-हे केशव, प्रकृति, आणिपुरुष, क्षेत्र, आणि क्षेत्रज्ञ, तसें ज्ञान, आणि ज्ञेय, यांसमी जाणूं इच्छितों. १

## ॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ॥ १३ ॥

कृष्ण सांगतात-हे कौंतेय, या शरीरास क्षेत्र ह्मणतात; आणि या क्षेत्रास जाणणारा जो त्यास क्षेत्रज्ञ असें ह्मणतात. १ तो सर्वदेहीं मी असें जाण, आणि क्षेत्रही मीच असें जाण. क्षेत्राचें, आणि क्षेत्रज्ञाचें जाणणें, तें ज्ञान मला मत होय. २

आतां क्षेत्राचें स्वरूप तसा प्रकार, आणि विकार, आणि जापासून तें झालें, आणि खीज्ञाचें स्वरूप तसा प्रभाव हें सर्व संक्षेपें करून सांगतों ऐक. ४ जें ऋषींहीं बहुप्रकारें वर्णिलें; वेदांहीं प्रतिशाखेंत अनेकप्रकारें गाइलें; तसें हेतुगर्भ आणि निश्चितार्थ अशा ब्रह्मसूत्रपदांनीं सांगीतलें त्याचें श्रवण कर. ५

क्षेत्र ह्मणजे-पंचमहाभूतें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त*, एकादश इंद्रियें, तसे पांच इंद्रियविषय, ६ आणि इच्छा, सुख, दुःख, तसा संघात**, चेत

---

* शरीर

** आत्मा इंद्रियें आणि मन एतद्रूप भोक्ता.

ना, ह्मणजे बुद्धि, आणि धृति, इतक्यांचा योग होय.

याप्रकारें तुला मी संक्षेपेंकरून क्षेत्र, विकारसहित सांगीतलें. ७

ज्ञान ह्मणजे अमानित्व. १ अदंभित्व, २ अहिंसा, ३ क्षांति ह्म० सहनशीलता. ४ आर्जव ह्म० सरलपणा, ५ आचार्योपासन. ६ शौच ह्म० शुद्धता. ७ स्थैर्य ह्म० मोक्षमार्गीं विघ्नें झालीं असतां ही त्यांची गणना न करणें, ८ आत्मविनिग्रह, ९ ८ इंद्रियांचा अर्थांचाठाईं वैराग्य ह्म० त्यांचाठाईं प्रीतिनसणें. १० अनहंकार, ११ जन्ममृत्युजराव्याधींचाठाईं दुःख आणि दैन्यादिदोष यांचें अनुदर्शन, १२. ९ पुत्र, दार, आणि गृहादिकयांचाठाईं असक्ति ह्म० ममता. नसणें, १३ अनभिष्वंग ह्म० त्यांसच आपण असें मानून अभिमान न धरणें ह्म० पुत्रादिक सुखी आणि दुःखी असतां मी सुखी, मी दुःखी, असें न मानणें

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञ विभाग योग ॥ १३ ॥

१४ इष्टानिष्टोपपत्तीच्याठाईं समचित्तत्व, १५ १० अनन्य योगेंकरून माझाठाईं अव्यभिचारिणी भक्ति, १६ विविक्तदेशसेवित्व ह्म० एकांतीं राहणें, १७ जनसभेच्याठाईं अरति ह्म० अप्रीति, १८ ११ अध्यात्मज्ञाननित्यत्व, १९ तत्वज्ञानार्थदर्शन ह्म० तत्वज्ञानाचा प्रयोजनाचें पहाणें, यांस ज्ञान ह्मणतात. याहून जें अन्य तें अज्ञान असें जाण. १२

आतां जें ज्ञेय तें सांगतों — जें जाणून प्राणी अमृतत्व ह्म० मोक्ष पावतो. त्यास आदि नाहीं, तें निर्विशेष ब्रह्म होय, त्यास सत् (आहे असें) ह्मणतां येत नाहीं, आणि असत् (आहे असें) हीं ह्मणवत नाहीं. १३ जें सर्वत्र कर, चरण, नेत्र, मुखें, मस्तक, आणि श्रवणें, यांहीं करून युक्त होय, आणि जें लोकांत सर्वांस व्यापून राहातें. तें सर्वेंद्रियवर्जित असत्तां, सर्व इंद्रियें, आणि विषय यांसारिखें भासतें, तें सृष्टीचा आंतबा

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ॥ १३ ॥

हे रआहे. तें चर, आणि अचर, होय. १५ आणि सूक्ष्म ह्मणून अविज्ञेय होय. तें दूरस्थ असूनस मीपस्थ होय. अविभक्तअसून भूतांचाठाईं विभक्ताचेपरि राहिलें आहे. तें भूतांचा धारण, संहार, आणि उत्पत्ति, याचें कर्त्रें होय. तें ज्योतीचेंज्योति होय. आणि त्यास तमाहूनपर असें ह्मणतात. १७ तें ज्ञान, ज्ञेय, तसें ज्ञानगम्य होय. आणि तें सर्वांचें हृदयस्थ आहे. १८

याप्रकारें क्षेत्र ह्म० शरीर, तसेंच ज्ञान, आणि ज्ञेय, ह्म० जाणायाचें वस्तु, याचें समासें करून निरूपण केलें. हें त्रयजाणूनमाझा भक्त मद्भाव ह्म० ब्रह्मभाव त्याकारणें युक्त होतो. १९

प्रकृति आणि पुरुष यादोघांस अनादि असें जाण. सत्त्व, रज, तम, हे गुण, आणि विकार, ह्म० तज्जन्य कार्य, हे प्रकृतिसंभव जाण. २०

*कार्यकारण कर्तृत्वेंकरून प्रकृति, आणि

---

*कार्य= शरीर आणि कारण ह्म० तदारंभक पंचमहाभूतादिक.

## ॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग॥१३॥

सुखदुःखांचा भोक्तृत्वेंकरून पुरुष संसार कारण असें ह्मणतात. २१ पुरुष प्रकृतिस्थ होत्साता प्रकृतिजनित गुणास भोगितो. पुरुषास सदसद्योनि ह्म० उत्तमाधम मध्यम योनितज्जन्माविषयीं कारण गुण संग होय. २२ पुरुष तो परमात्मा जास महेश्वर असें ह्मणतात. आणि तो या देहाच्याठाईं उपद्रष्टा,( साक्षी ) अनुमंता,आणि भर्त्ता, (पालक ) आणि भोक्ता होय. २३

या प्रकारें पुरुषास,आणि प्रकृतीस, गुणांसह वर्त्तमान जो जाणतो, तो कसाही वर्त्तत असतां पुनर्जन्म पावत नाहीं. २४

कितीएक आपण आपणास आपणाच्या ठाईं ध्यानेंकरून पाहतात. अन्य सांख्य योगें करून,इतर कर्मयोगेंकरून, कित्येक हें न जाणत होत्साते दुसऱ्यापासून ऐकून त्याजवर मन ठेवितात, तेही श्रुतिपरायण ह्मणजे श्रवणतत्पर होत्साते मृत्यूस तरून जातात. २६

॥ क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग ॥ १३ ॥

हे पुरुषर्षभ सर्व स्थावर जंगम सत्व, क्षेत्र क्षेत्रज्ञ योगें करून उत्पन्न होतें. असें जाण. २७ परमेश्वरास सर्व भूतीं समान राहणारा, आणि तीं नाश पावत असतां, नाश न पावणारा असें जो पाहातो, तो पाहतो. २८ जो ईश्वरास सर्व भूतीं समान पाहतो, तो आपण आपला घात न करितां, परगती प्रत पावतो. २९ जो प्रकृतीच कर्म कर्त्री, आणि आपण अकर्त्ता असे पाहतो, तो पाहतो. ३० ज्या काळीं प्राणी भूतांचा पृथक् भावास एकस्थ पाहतो. आणि त्या एकापासून विस्तार पाहतो त्या काळीं तो ब्रह्मरूप होतो. ३१ हे कौंतेय, हा अव्यय आत्मा शरीरस्थ असतांही कांहीं करित नाहीं, आणि लिप्तही होत नाहीं. ३२ कां कीं तो अनादि, तसा निर्गुण आहे. जसें सर्वगत आकाश सूक्ष्मत्वास्तव लिप्त होत नाहीं, तसा सर्व व्यापक आत्मा देहाचा ठाईं लिप्त होत नाहीं. ३३ जसा एक सूर्य सर्व लोकांस प्रकाशवितो, तसा एक क्षेत्रज्ञ

॥ गुणत्रयविभागयोग ॥१४॥

सर्वक्षेत्रांस प्रकाशवितो. जे ज्ञानचक्षूकरून क्षेत्रक्षेत्रज्ञाचें अंतर, ह्मणजे भेद, यास पाहतात, आणि भूतप्रकृतीपासून मोक्ष होतो असें जाणतात, ते ब्रह्मपद पावतात. ३५

---

॥ गुणत्रयविभागयोग ॥

॥ अध्याय ॥१४॥

कृष्ण ह्मणतात-आतां ज्ञानामध्यें उत्तम ज्ञान तुला सांगेन. जें जाणून सर्व मुनि या संसारापासून परसिद्धि ह्मणजे मोक्ष त्याप्रत पावले.१

या ज्ञानाचा आश्रय करून माझें साधर्म्य ह्मणजे सार्धर्म्य सर्वनियंतृत्वादि धर्मसाम्य, त्याप्रत पावलेले पुरुष सृष्टीचा ठाईं होत नाहींत, आणि प्रलयीं व्यथा पावत नाहींत. २

माझी योनि ह्मणजे गर्भाधानस्थान महद्ब्रह्म. ह्मणजे गुणात्मक माया होय. त्याचा ठाईं मी गर्भ ठेवितों. त्यापासून सर्व भूतांचा संभव होतो.३

## ॥गुणत्रयविभागयोग॥१४॥

सर्व भूतांच्याठाईं नानाप्रकारच्या ज्या मूर्ति होतात त्यांची योनि ह्मं॰ उत्पत्तिस्थान माया आणि बीजदाता पिता मी होय. ४

प्रकृतीपासून तीन गुण जाहले. त्यांचीं नावें- सत्व, रज, आणि तम ते अव्यय आत्म्यास देहाच्याठाईं बंधन करितात. ५ त्यामधें अनामय, ह्मं॰ रजस्तमोरहित, अतएव निर्मळत्वास्तव प्रकाशक, असा सत्वगुण सुखसंगेंकरून आणि ज्ञानसंगेंकरून आत्म्यास बंध करितो. ६ रजोगुणास रागात्मक, आणि तृष्णा तसा संग यांचें कारण असें जाणतो. कर्मसंगेंकरून देहाभिमान्यास बंध करितो. ७ तमोगुण अज्ञानापासून झाला, तो सर्वजीवांस मोह करणारा असें जाणतो- प्रमाद, आळस्य, आणि निद्रा यांहींकरून आत्म्यास बंधन करितो. ८ सत्वगुणाच्याभर सुखाच्याठाईं, तसाच रजोगुणाच्या कर्माच्याठाईं असतो; आणि तमोगुण ज्ञानाचें आवरण करून

॥ गुणत्रयविभागयोग ॥ १४ ॥

अज्ञानाचा ठाईं असतो. सत्वगुण रजस्तमास, तसा रजोगुण सत्वतमास, आणि तमोगुण सत्वरजांस, पराभवून संभवतो. १० ज्यासमयीं देहांत सर्वद्वारीं प्रकाश, आणि ज्ञान होतें, त्यास मयी सत्वगुणाची वृद्धी जाणावी. ११ रजोगुणाची वृद्धि झाली असतां, लोभ प्रवृत्ति, कर्मारंभ, अशम, आणि वासनाहीं होतात. १२ आणि तमोगुण प्रवृद्ध झाला असतां, अप्रकाश, अप्रवृत्ति, प्रमाद, मोह, हे होतात. १३ देहोत्क्रमण समयीं सत्त्वगुणाची वृद्धि असतां, उत्तमवित् (ह्मणजे हिरण्यगर्भोपासक देव) यांच्या अमललोकांप्रत पावतो. १४ रजोगुणीं देहविसर्जन झालें असतां, कर्मसंगीजनाचा ठाईं पुनः होतो. तमोगुणीं देहपात झाला असतां, मूढयोनीच्या ठाईं जन्म पावतो. सात्विक कर्माचें फल निर्मल ह्म० दुःखाज्ञान रूपमूलशून्य आणि सात्विक, ह्म० ज्ञानवैराग्यादिक होय. राजस क

## ॥ गुणत्रयविभागयोग ॥ १४ ॥

र्मांचें फल दुःख, आणि तामस कर्मांचें फल अज्ञान होय. १६ सत्त्वगुणापासून ज्ञान होतें; रजापासून लोभ; आणि तमापासून प्रमाद मोह, आणि अज्ञान होतें. १७ सत्वस्थ उर्ध्वगति पावतात; राजसांला मध्यावस्थान होतें, आणि तामसांस अधोगति होते. १८

जेव्हां द्रष्टा (आत्मा) गुणाहून अन्यकर्त्ता असें पाहत नाहीं, ह्मणजे गुणच कर्त्ते असें पाहातो, आणि आत्म्यास गुणाहून पर जाणतो, तेव्हां तो मद्भावातें पावतो. १९ जीव, या स्थूलदेहाचा उत्पादक अशा यां तीन गुणास अतिक्रमून, जन्म मृत्यु जरा दुःखेंकरून विमुक्त होत्साता, अमृतातें (मोक्षातें) पावतो. २०

अर्जुन प्रश्न करितो – हे प्रभो. त्रिगुणातीतास कोणत्या लक्षणेंकरून ओळखावें ? त्याचा आचार काय ? आणि कोणत्या उपायेंकरून तो त्यांस* अतिक्रमितो ? २१

---

* गुणास

## ॥ गुणत्रयविभागयोग ॥१४॥

कृष्ण सांगतात - हे पांडव, ज्ञानप्रकाश, प्रवृत्ति - ह्मणजे संसारीं उद्युक्तत्व, तसा मोह हे असतां यांचा द्वेष, आणि हे नसतां त्यांची इच्छा करित नाहीं; २२ आणि उदासीनवत् असतो; तसा जो गुणेंकरून चळत नाहीं, आणि गुणवर्तन असतां तो स्तब्ध असतो, चलित होत नाहीं: २३ जो स्वस्थ, जास सुखदुःखें समान, जास मृत्तिका. पाषाण, आणि सुवर्ण हीं समान, जास प्रिय आणि अप्रिय तुल्य, अतएव तो धैर्यवान्, जास निंदास्तुति समान, २४ जो मानीं, आणि अपमानीं, तसा मित्र, शत्रु यांचाठाईं सम, आणि सर्वोद्योगांचा परित्याग करितो, त्यास गुणातीत ह्मणतात. २५ जो अव्यभिचार भक्तियोगेंकरून मला सेवितो, तो यां गुणातें अतिक्रमून ब्रह्मभावाकारणें योग्य होतो. २६ अविनाशी, ह्मणजे स्वतः प्रमाणभूत, आणि अमृत ह्मणजे मोक्षसाधन, अशा ब्रह्माची ह्म० वेदाची प्रतिष्ठा ह्म० पर्यवसानस्थान मी होय. शा-

॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

श्वत अशा धर्माची प्रतिष्ठा ह्मं० फलभूत मी. आणि अव्यभिचारि सुखाची प्रतिष्ठा ह्मं० पराकाष्ठा मी होय. २७

॥ पुराणपुरुषयोग ॥

॥ अध्याय ॥ १५ ॥

कृष्ण ह्मणतात- ज्याचें मूळ ऊर्ध्व, आणि शाखा खालीं- वेद ज्याचीं पर्णे, अशा अश्वत्थवृक्षास अव्यय ह्मणतात*. जो त्यास जाणतो तो वेदवेत्ता होय. गुणेंकरून वाढले त्या, विषय ज्यांचे पल्लव अशा त्या अश्वत्थवृक्षाच्या शाखा अधः आणि ऊर्ध्व प्रसृत आहेत. आणि याचीं (अवांतरवासनारूप) मूळें कर्मानुसारि होत्साती खालीं मनुष्यलोकीं विस्तृत आहेत. २ येथे याचें रूप, आदि, अंत, आणि स्थितिही समजत नाहींत. अत्यंत वि

* भावसंसार हा अश्वत्थ ह्मं० क्षणभंगुर वृक्ष होय. याचें मूळ सर्वोपरि स्थित ब्रह्म अतएव तें ऊर्ध्व होय आणि त्यापासून उत्पन्न अव्यक्त महदहंकारादिक त्याच्या शाखा यास्तव त्या खालीं होत.

## ॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

रूढ जाल्यें मूल, अशाया अश्वत्थास, दृढ अशा अ-संगरूप शस्त्रें करून छेदून, २ त्यानंतर तें पद शोधावें ज्यापदीं गलेले पुनः निवर्त्तत नाहींत; आणि असी भावना धरावी कीं जेथून पुरातन प्रवृत्ति उत्पन्न झाली त्याचे आद्यपुरुषाप्रत मी शरण जातों.

जे मान मोहरहित, ज्याणीं संगदोष जिंकिले, तसेजे आत्मध्यानपर, आणि जे निवृत्तकाम, तसे सुखदुःखादि संज्ञद्वंद्वें करून विमुक्त जहाले, असे ज्ञानी त्या अविनाशि पदाप्रत जाताहेत. ज्यापदापासून पुनः निवृत्ति नाहीं. तें माझें परम धाम होय. ज्यास सूर्य, चंद्र, आणि अग्नि प्रकाशवित नाहींत-तें स्वयंप्रकाश होय. ६ ईश्वर शरीरास व्यापितो, आणि उत्क्रांत होतो, ह्मणून जीवलोकीं पुरातन असा जीव माझाच अंश होय. तो प्रकृतिस्थ अशा मनासहवर्तमान साहा इंद्रियांस निद्रा, प्रलय, समाधिकालीं आटोपितो. आणि तो वायु जसा पुष्पापासून गंधास घेऊन जातो, तसाजा

॥पुराणपुरुषयोग॥१५॥

गति, सृष्टि, आणि समाधि, विसर्जन यांचा का
ळीं आपल्या लयस्थानापासून या इंद्रियांस घे
ऊन विषयदेशाप्रत जातो. ८ आणि त्यांस (क
र्ण,नेत्र,त्वचा,जिव्हा,नासिका,तसें मन, या इंद्रि-
यांस) अधिष्ठून, म्ह० व्यापारयुक्त करून, विष
यांतें सेवितो. ९ मूढजन जीवास गुणयुक्त अ
सतां,तसा उत्क्रांत होत असतां, आणि राहात
असतां, तसा भोगभोगित असतां, पहात ना-
हींत-म्ह० गुणसंयोग,उत्क्रमण स्थिति, आणि
भोग यां इंद्रियादि धर्मांचा आरोपत्याचाठाईं क
रितात. ज्ञातेतर त्यास पहातात, म्ह० उत्क्रमणा
दिक उपाधीसच घडतें,शुद्ध आत्म्यास नाहीं अ
सें जाणतात. १० यत्न करणारे योगी आत्मा म्ह०
बुद्धि तीचाठाईं स्थित अशा त्या जीवास पहातात
म्ह० तो निःसंग तसा उत्क्रांत्यादिहीन आहे असें जा
णतात. अकृतात्मे म्ह० अशोधित चित्त असे मूढ
यत्न करित असतांही त्याला पाहत नाहींत. ११

॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

सर्व जगास प्रकाश वितें असेंजें सूर्यगत, चंद्रगत, आणि अग्निगत तेज तें तेज माझें जाण. १२ मी आपल्या सामर्थ्यानें पृथिवीचा ठाईं प्रवेश करून भूतांचें धारण करितों, आणि जलमय चंद्र होऊन सर्व ओषधींस पोषितों. १३ मी अग्नि होवून जीवांचा शरीराप्रत आश्रित असा प्राण, आणि अपान, यांहीं करून युक्त होत्साता चतुर्विध* अन्नाचें पचन करितों. १४ मी सर्वांचा हृदयीं प्रविष्ट आहें. मजपासून स्मृति आणि ज्ञान तसें अपोहन, ह्म० विस्मृति, आणि अज्ञान हीं होतात. सर्व वेदें करून ज्ञेय तो मीच. वेदांचा कर्त्ता आणि वेदवेत्ता ही मीच होय. १५

लोकांत दोन पुरुष प्रसिद्ध आहेत - क्षर आ

---

* भक्ष्य १ भोज्य २ लेह्य ३ चोष्य ४ ह्मणजे दांतानीं खायाचें १ तें अपूप पृथुकादि १ दंतांवांचून भक्षायाचें २ तें चरुपायसादि २ चाटायाचें ३ तें मधुशर्करादि ३ चोखायाचें ४ तें इक्षु आम्रादि ४

णि अक्षर, त्यांत सर्व भूतांस क्षर असें ह्मणता-
त. कूटस्थास ह्मणजे ज्यास भोक्तृत्वादि संबंध
नाहीं त्यास अक्षर ह्मणतात. १६ दोघांहून अन्य
तो उत्तम पुरुष ज्यास परमात्मा ह्मणतात. जो ई-
श्वर ह्मणजे मायोपाधि होत्साता, लोकत्रय ह्मं०
उत्तमाधम मध्यम शरीरें त्यांप्रत प्रवेश करून
त्यांचें धारण करितो. तथापि तो अव्यय होय. १७
ज्यास्तव मी क्षराक्षरातीत आहें त्यास्तव त्यांहू-
न उत्तम होय. ह्मणून मी लोकीं, आणि वेदीं, पुरु
षोत्तम नाम पावलों आहें. १८ जो ज्ञाता मला
पुरुषोत्तम असें जाणतो तो सर्ववेत्ता होय. आ
णि तो सर्व भावें मला भजतो. १९

हे भारत, या प्रकारें हें अत्यंत गुह्य शास्त्र
मी तुला सांगीतलें. याला जाणून मनुष्य बुधि-
मान् तसा कृतकृत्य होईल. २०

## ॥ दैवासुरसंपद्विभागयोग ॥

### ॥ अध्याय ॥ १६ ॥

कृष्ण ह्मणतात-अभय-सत्त्वसंशुद्धि,
ह्म० चित्तनैर्मल्य, ज्ञानयोगव्यवस्थिति, दान,
दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, ह्म० सरल
ता, १ अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, ह्म० कर्म
सन्यास, शांति, अपैशुन, ह्म० परदोषप्रकाशन
न करणें, भूतदया, अलोलुपत्व, ह्म० अलंप
टपणा, मार्दव, ह्म० मृदुपणा, ह्री ह्म० लज्जा,
अचापल, २ तेज, क्षमा, धृति, शुद्धता, अद्रो
ह, आणि अभिमानराहित्य, हीं दैवसंपत्ति ज्या
स असते त्याचीं लक्षणें होत. ३ असुरसंप
त्तियुक्तांचीं लक्षणें दंभ, दर्प, अभिमान, क्रोध,
पारुष्य ह्म० निष्ठुर भाषण, अज्ञान हीं होत. ४
दैवी संपत्ति मोक्षार्थ, आणि असुरी बंधार्थ, हो
य. हे पांडव, तूं शोक करूं नकोस, कांकीं तुझें ज
न्म दैवी संपत्तीच्या ठाईं झालें आहे. ५ याप्रकारें
या लोकांत दैव आणि आसुर असे दोन भूतसर्ग,

॥दैवासुरसंपद्विभागयोग॥१६॥

ह्मणजे भूतस्वभाव आहेत, त्यांतून दैव विस्तरें करून वर्णिला. आसुर काय तो मजपासून श्रवण कर. ६

आसुरजन प्रवृत्ति ह्म० धर्म आणि निवृत्ति ह्म० अधर्म या दोहोंस जाणत नाहींत. त्यांचा ठाईं शौच, आचार, आणि सत्यही नाहींत. ७ ते या जगाला सत्यवर्जित आणि अप्रतिष्ठ ह्म० धर्माधर्मप्रतिष्ठारहित. आणि अनीश्वर, ह्म० नियंतृशून्य, असें बोलतात; आणि तें अपरस्परसंभूत ह्म० बीजांकुरवत् परस्पर कारणीभूत अशा धर्म आणि धर्मवासना यांचा सततपणानें होत नाहीं, स्त्रीपुरुषांचा संयोगेंकरून होतें-आणि-रची काय आहे. सर्व कामहेतुक होय, असें ह्मणतात. ८ ही समजूत घेऊन नष्टात्मे आणि अल्पबुद्धि; उग्रकर्मे करणारे अहित ह्मणजे हिंसा करणारे असे जगाचा क्षयार्थ उत्पन्न होतात. ९ ते मोहेंकरून खोटी समजूत स्वीकारून दुःपूर अशा

॥ दैवासुरसंपद्विभागयोग ॥ १६ ॥

कामाचा आश्रय करून, दंभ, मान, मदें करून, युक्त तसे जांचीं व्रतें अशुचि ह्मं॰ मद्यादिसापेक्ष, असे कर्में करितात. १० आणि अपरिमेय अशा (यो गक्षेमविषय) चिंतेचा मरणपर्यंत आश्रय करितात. आणि कामभोगच पुरुषार्थ असा निश्चय करून असतात. ११ आणि शतसंख्याक अशा पाशें करून बद्ध, तसे काम, क्रोध, परायण होत्साते कामभोगार्थ अन्यायें करून द्रव्य संचयाविषयीं उद्योग करितात. १२ "हें आज मींमि "ळविलें या मनोरथातें पावेन, इतकें धन माझाजवळ "आहे, आणि इतकें आणिखी मला प्राप्त होईल; "१३ हा शत्रु मी मारिला. आणि दुसऱ्या शत्रूंस "ही मी मारीन. मी थोर, मी भोगसंपन्न, मी सि "द्ध, मी बलवान्, मी सुखी, १४ मी आढ्य, मी कुली "न, मजसारिखा दुसरा कोण आहे ? मी यजन क "रीन, दान करीन, आनंद पावेन." या प्रकारें ते अज्ञानविमोहित जन बोलत असतात. १५ ते अने

॥ दैवासुर संपद्विभाग योग ॥ १६ ॥

क चित्त, विभ्रांत तसे मोहरूप जालें करून समाट
त्त आणि कामभोगीं अत्यासक्त होत्साते अशुचि न
रकांत पडतात. १६ ते आत्मसंभावित म्ह० आप-
णास थोर मानणारे गर्विष्ठ- तसेच धन मान, आ
णि मद यांहीं करून युक्त होत्साते, दंभें करून नामय
ज्ञ म्ह० नावाचे मात्र यज्ञ, त्यांहींकरून यजन करि-
तात. विधिपूर्वक करित नाहींत. १७ आणि अहंकार
बल, दर्प, काम, क्रोध, यांचा आश्रय करून सन्मार्गा
ची निंदा करितात, आणि स्व, परदेहांत माझा द्वेष
करितात. १८ असे द्वेष्टे क्रूर, अशुभ, जे नराधम,
त्यांस मी लोकांत आसुरीच योनीचा ठाईं निरंतर
टाकितों १९ असे ते जन्मजन्मीं असुर योनीप्रत पा
वून माझी प्राप्ति नहोतां शेवटीं अधम गतीप्रत
जातात. २० आपला नाश करणार असें काम,
क्रोध, आणि लोभ, हें त्रिविध नरकाचें द्वार होय. या
स्तव यातिंहींचा त्याग करावा. २१ कांकीं यातीन
नरकांचा द्वारें करून मुक्त असा पुरुष आपल्या

## ॥श्रध्यात्रयवर्णन॥१७॥

श्रेयास आचरितो, आणि परिणामीं परगतीप्रत जातो. २२ जो शास्त्रविधीस टाकून कामकारेंकरून ह्म० यथेच्छ वर्त्ततो, तो सिद्धि सुख आणि परगति यांतें पावत नाहीं. २३ तस्मात् तूं कार्याकार्यव्यवस्थे विषयीं शास्त्रप्रमाण जाणून शास्त्रविधानोक्त कर्म कर. २४

---

## ॥श्रध्यात्रयवर्णन॥

### ॥अध्याय॥१७॥

अर्जुन प्रश्न करितो- जे शास्त्रविधीस सोडून श्रध्देकरून युक्त होऊन यजन करिताहेत त्यांची निष्ठा कोणती ? सत्व, रज, अथवा तम तें सांग ?

कृष्ण सांगतात.- जीवांस सात्विकी, राजसी, तामसी, असी त्रिविध श्रध्दा असते ती स्वभावजनित होय. तीस ऐक. २ सर्वांची श्रध्दा सत्वानुरूप आहे. हा पुरुष श्रध्दामय होय. ज्याची जी श्रध्दा तो तच्छ्रध्दारूप होय. ह्म० सात्विक श्रध्देकरून युक्त

॥ श्रद्धात्रयवर्णन ॥ १७ ॥

तो सात्विक, राजस श्रद्धेकरून युक्त तो राजस, तामस श्रद्धेकरून युक्त तो तामस*. ३ सात्विक देवांचें, राजस जन, यक्ष, राक्षसांचें, तामस भूत प्रेत गणांचें यजन करितात. ४ जे अशास्त्र विहित घोर तप करितात, ते दंभ, आणि अहंकार, यांहींकरून युक्त आणि कामराग बळेंकरून संपन्न होत. ५ ते मूर्ख शरीरस्थ भूतग्रामास, म्ह० इंद्रिय समुदायास, आणि अंतः शरीरस्थ, अशा मलाही पीडा करितात. त्यांस असुर निश्चय असें जाण. ६

सर्वांस त्रिविध आहार प्रिय आहे. यज्ञ, तप, तसें दानहीं ही प्रत्येक त्रिविध आहेत, त्यांचे भेद ऐक. ७

आयुष्य, सत्व, बळ, आरोग्य, सुख, आणि प्रीति यांस वाढविणारे, रसवंत, स्निग्ध, स्थिर, आणि हृदयास प्रीति करणारे असे आहार सा

---

* सारांश जसा ज्याचा स्वभाव तशी त्याची श्रद्धा असते.

॥श्रध्दात्रयवर्णन॥१७॥

खिकास आवडतात.८ अतिकटु, अत्यम्ल, अतिलवण, अत्युष्ण, अति तीक्ष्ण, अति रुक्ष, तसे अति विदाही, असे दुःखशोक रोगदेणारे आहार राजसाला इष्ट होत. ९ यातयाम ह्मं॰ प्रहराचापूर्वी पाचित, सारांश थंड, रस रहित, दुर्गंधयुक्त, शिळें, उच्छिष्ट, आणि अमंगल, असें भोजन तामसालाप्रिय असतें. १०

फलेच्छा सोडून यजन आवश्यक होय, असें मनाचें समाधानकरून जा विध्युक्त यज्ञास आचरितात, तो यज्ञ सात्विकहोय. ११

फलानुसंधान धरून, अथवा दंभार्थ जे यजितात, त्या यज्ञास राजस असें जाण. १२

विधिहीन, आणि जांत अन्नसमर्पण नाहीं, तसा मंत्र, दक्षिणाहीन, आणि श्रध्दाविरहित, अशा यज्ञास तामस असें ह्मणतात. १३

देव, द्विज, गुरु, आणि ज्ञाते, यांचें पूजन, आणि शौच, सरलता, ब्रह्मचर्य तसी अहिं-

॥ अथात्रयवर्णन ॥ १७ ॥

त्या यांस कायिक तप ह्मणतात. १४

सत्य प्रिय, तसें हित, आणि अनुद्वेगकर, असेंजें भाषण; आणि वेदाध्ययन यांस वाचिक तप ह्मणतात. १५

मनःप्रसन्नता, सौम्यत्व, मौन, आत्मविनिग्रह ह्म० मनोनिरोध भावसंशुधि ह्म० कपटराहित्य, इतुक्या समानस तप ह्मणतात. १६

हें त्रिविध तप फलेच्छा सोडून सावधानपणें परश्रद्धे करून केलें असतां त्यास सात्विक तप ह्मणतात. १७

सत्कार, मान, पूजार्थ दंभें करून केलेल्या तपास राजस ह्मणतात. तें चल आणि अध्रुव होय. १८

मूढग्राह ह्म० अविवेक कृतदुराग्रह त्याणें करून शरीरास पीडा करून किंवा दुसऱ्याचा उत्सादनार्थ केलेल्या तपास तामस ह्मणतात.

द्यावें अशा बुध्धी करून प्रत्युपकारानु सं-

॥ श्रद्धात्रयवर्णन ॥१७॥

धान न धरितां कालीं, देशीं, आणि पात्रीं, जें द्रव्य समर्पण तें सात्विक दान होय. २०

प्रत्युपकारासाठीं किंवा फलोद्देशें करून, आणि राज· ··करून, जें द्रव्य समर्पण तें राजस दान होय· पाचित, स· ·त्कार रहित आणि अवज्ञायुक्त, तसें अ ·देशीं अकालीं आणि अपात्रीं जें दान तें तामस होय. २२

ओम्, तत्, सत् ही त्रिविध ब्रह्माची संज्ञा होय. तीणें करून विधीनें आरंभीं ब्राह्मण, वेद, आणि यज्ञ केले. २३ यास्तव ब्रह्मवेत्त्यांचा यज्ञ दान तपोरूप विधानोक्त क्रिया ओम् असें उच्चारून निरंतर प्रवर्त्तताहेत. २४

तसें मुमुक्षु फलाभिसंधानरहित असे तत् असें उच्चारून विविध यज्ञ, तप, क्रिया, करितात. २५

सद्भावीं आणि साधुभावीं सच्छब्दाचा प्रयोग करितात. तसा हे पार्था प्रशस्त कर्मींहीं सत्

शब्दाचा प्रयोग करितात. २६ यज्ञ, दान, तप, यांचाठाईं जी स्थिति ह्मं॰ निष्ठा तिलाही सत् ह्मणतात. आणि परमेश्वर प्रीत्यर्थ कर्मासिही सत् ह्मणतात. सारांश ओम् तत्सत् अशा ब्रह्मवाचक नामत्रयाचा श्रद्धापूर्वक उच्चारणें करून सर्वकर्म सद्गुण होतें. २७

होम, दान, तपोनुष्ठान, भगवन्नामत्रयस्मरण, तसें अन्य सर्वकर्म, अश्रद्धेकरून केलें असतां त्याला असत् ह्मं॰ अभावभूत ह्मणतात. त्याचा इहलोकीं आणि परलोकीं उपयोग नाहीं.

---

## ॥ मोक्षयोग ॥

## ॥ अध्याय ॥ १८ ॥

अर्जुन प्रश्न करितो, हे महाबाहो, हे हृषीकेशा, हे केशिदैत्याचा मारणाऱ्या, संन्यासाचें आणि त्यागाचें तत्व मी वेगळें जाणूं इच्छितों.

कृष्ण सांगतात — काम्यकर्माचा सोडण्या

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

ला संन्यास असें विद्वान् जाणतात. आणि स र्व कर्मांचा फलत्यागास विद्वान् त्याग ह्मणतात. २ कित्तीएक मनीषी ह्म० मनोनिग्रह समर्थ, कर्म दोषासारिखें टाकावें असें सांगतात. तसेंच कितिएक यज्ञ दान तप कर्म हीं न टाकावीं असें सां सांगतात. त्यागा विषयीं माझा निश्चय सागत्तों तो ऐक. ३

त्याग तीन प्रकारचा ह्मटला आहे. यज्ञ, दान, तप, हें कर्म टाकू नये तें करावेंच. कांकीं यज्ञ, दान, तप, हीं निष्काम पुरुषांस चित्त शोधक होत. ५ तरहींच कर्में, संग, आणि फलें, टाकून करावीं, असें माझें निश्चित उत्तम मत होय. ६ नियतकर्माचा संन्यास योग्य नाहीं. अज्ञानें करून जो त्या कर्माचा त्याग, त्यास तामसत्याग ह्मणतात. ७

कर्म दुःखरूप आहे असें मानून त्यास शरीरक्लेश, भयास्तव, त्यागितो तो त्याग राजस होय. तो करून पुरुष त्यागाचें फल पावणार नाहीं. ८

## ॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

कर्म अवश्य कर्तव्य होय, असें जाणून नियत कर्म, संग आणि फल टाकून करितो, तो त्याग सात्विक मानिला आहे. ९

अतएव जो पुरुष सत्व समाविष्ट ह्मणजे सात्विक, तो त्यागी होय. तो बुधिमान् तसा च्छिन्नसंशय होत्साता असुखप्रद कर्माचा द्वेष करित नाहीं, आणि सुखप्रद कर्मी आसक्त होत नाहीं. १०

देहधारी पुरुषास संपूर्ण कर्माचा त्याग अशक्य होय. तस्मात् जो कर्मफलास टाकणारा, त्यास त्यागी असें यथार्थ ह्मणतात. ११

कर्माचें त्रिविध फल आहे. इष्ट, अनिष्ट, आणि मिश्र. तें पूर्वोक्त त्याग न करणारास मरणानंतर प्राप्त होतें. पूर्वोक्त त्याग करणारास कधीं होत नाहीं. १२

हे महाबाहो, ज्यामधें कर्माची परिसमाप्ति होते अशा वेदांत शास्त्रीं सर्व कर्माचा सिध्यर्थ हीं पांच कारणें सांगीतलीं आहेत. तीं मजपासून

॥मोक्षयोग॥१७॥

जाण. १३ अधिष्ठान ह्म० आश्रय ह्म० देह, १ कर्त्ता ह्म० अहंकार. २ करण ह्म० शब्दाद्युपलब्धि साधनतें पृथग्विध ह्म० पांचकर्मेंद्रियें, पांचज्ञानेंद्रियें, मन, बुध्दि, असें द्वादश प्रकारक, ३ आणि विविध पृथक् चेष्टा ह्म० व्यापार, ४ तसेंपांचवें दैव. ५ १४ मनुष्य कायिक, वाचिक, मानसिक जें धर्म्य किंवा अधर्म्य, कर्म आरंभितो. त्याला हे पांच हेतु असतात. १५ असें पांच कारणानीं कर्म होत असतां, अज्ञानास्तव जो आपणासच कर्त्ता असें पहातो, तो दुर्मति अगदीं जाणत नाहीं. १६ ज्यास अहंकार नाहीं, आणि ज्याची बुध्दि लिप्त नाहीं ह्मणजे जो आपणास बुध्दीहून पृथक् पाहतो, (यास्तव कर्त्तृत्वादि बुध्दिधर्म आपणांत पाहत नाहीं) तो पुरुष या लोकांस मारून ही मारीत नाहीं, आणि बंध पावत नाहीं. १७

ज्ञान, ज्ञेय, आणि परिज्ञाता, तीन कर्म प्रवर्त्तक होत. तसा कर्म संग्रहही करण, कर्म, कर्त्ता,

असा त्रिविध आहे. १८ ज्ञान, कर्म, आणि कर्त्ता यातिहींस कापिल शास्त्रीं गुणभेदें करून त्रिविध ह्मटलें आहें. तेंही यथास्थित ऐक. १९

विभक्त अशा सर्व भूतांच्याठाईं, अविभक्त आणि अव्यय असा एक पदार्थ जाणें करून पाहातो, तें ज्ञान सात्विक जाण. २०

तें ज्ञान राजस जाण, जाणें करून भूतीं पृथग्विध असे नाना प्रकारचे पदार्थ दिसतात. २१

जें अल्प आणि एक कार्याच्याठाईं पूर्णवत् लागलेलें, आणि तत्वार्थ शून्य तें ज्ञान तामस ह्मटलें आहे.

फलेच्छा न धरणाराने संग आणि रागद्वेष यांस सोडून जें नियत कर्म केलें, त्यास सात्विक कर्म ह्मणतात. २३

सकाम अथवा साहंकार पुरुष जो बहुत आयासयुक्त कर्मास आचरितो त्यास राजस ह्मटलें आहे. २४

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

जे कर्म मोहेंकरून फळ, नाश, परपीडा, आणि पौरुष, याचा विचार न करितां आरंभिलें त्यास तामस ह्मणतात. २५

असंग, अहंकारानें न बोलणारा धैर्य, आणि उत्साह यांहींकरून युक्त, सिध्दि आणि असिध्दि यांचाठायीं निर्विकार, अशा कर्त्यास सात्विक ह्मणतात.

विषय लंपट, आणि कर्मफलाची इच्छा करणारा, तसा लोभी, परपीडनशील, अमंगळ, तसा इष्टानिष्ट प्राप्तीच्याठाईं हर्ष शोक पावणारा, असा कर्ता राजस ह्मटला आहे. २७

अयुक्त ह्म॰ असावधान, प्राकृत ह्म॰ असंस्कृत बुध्दि, स्तब्ध ह्म॰ अनम्र, शठ, वंचक, आळसी, विषादी, ह्म॰ खिन्न, तसा दीर्घसूत्र अशा कर्त्यास तामस ह्मणतात. २८

बुध्दीचा आणि धारणेचा गुणेंकरून त्रिविध असा भेद मी अशेष पृथक् सांगतों तोही ऐक.

प्रवृत्ति, आणि निवृत्ति, कार्य, अकार्य, भय,

॥ मोक्ष योग ॥ १८ ॥

अभय, बंध, मोक्ष. यांसजी आणती ती बुध्दि सात्विकी होय. ३०

जी बुध्दि, धर्म, अधर्म, कार्य, अकार्य, यांस यथास्थित जाणत नाहीं, ती बुध्दि राजसी होय.

जी तमेंकरून आदृत होत्साती, अधर्मास धर्म, आणि सर्व अर्थास विपरीत मानिते, ती बुध्दि तामसी होय. ३२

जा अचल धारणेंकरून मन प्राण आणि इंद्रियें याचा क्रियांस योग ह्मणजे एकाग्रतानीणेंकरून धरितो, ती धारणा सात्विकी होय. ३३

जा धारणेंकरून धर्म, काम, आणि अर्थ, यांचें धारण करितो, आणि त्यांचा संबंधानें फलास इच्छितो, ती धारणा राजसी होय. ३४

जीणेंकरून दुर्मति पुरुष निद्रा, भय, शोक, विषाद, मद, यांस सोडित नाहीं, ती धारणा तामसी होय. ३५ आतां तीन प्रकारचें सुख ऐक.

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

ज्या सुखीं अभ्यासें करून रमतो आणि दुःखांत ह्म० मोक्ष त्याप्रत पावतो, ३६ जें आरंभीं विषवत्, आणि परिणामीं अमृतोपम, अशा आपल्या बुद्धीचा प्रसन्नतेपासून उत्पन्न झालेल्या सुखास सात्विक ह्मटलें आहे. ३७

जें सुख विषय आणि इंद्रियें यांचा संयोगेंकरून होतें, आणि जें आदीं अमृततुल्य, आणि परिणामीं, विषोपम तें सुख राजस होय. ३८

आदीं, आणि परिणामीं, बुद्धीस मोहकारक, आणि निद्रा, आलस्य, प्रमाद, यांपासून उत्पन्न असें जें सुख तें तामस ह्मटलें आहे. ३९

इहलोकीं किंवा स्वर्गलोकीं देवांत या प्रकृतिजनित तीन गुणें करून मुक्त असा कोणी जीव नाहीं. ४०

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, यांचीं कर्मेंही प्रकृतिजनित गुणानीं विभक्त आहेत.

शम, ह्मणजे मनोनिग्रह, दम, ह्म० इंद्रिय

॥ मोक्षयोग ॥ १८॥

निग्रह, तप, शौच, म्ह० बाह्याभ्यंतर शुद्धता, क्षांति म्ह० क्षमा, आर्जव म्ह० सरळपणा, ज्ञानविज्ञान, आणि आस्तिक्य, म्ह० ईश्वराचागाई श्रद्धा, हें स्वाभाविक ब्रह्मकर्म, म्ह० ब्राह्मणत्वजाति ज्ञापक कर्म होय. ४२

शौर्य, तेज, धृति, दक्षपणा, युद्धीं अपलायन, दान, आणि नियंतृत्व, हें स्वाभाविक क्षत्रियकर्म होय. ४३

कृषि, गोरक्ष्य, आणि क्रय, विक्रय, हें स्वभावजनित वैश्य कर्म होय. तसेंच शूद्रांचें स्वाभाविक कर्म सेवा होय. ४४

आपआपल्या कर्मी अभिरत मनुष्य संसिद्धीतें पावतो. त्या सिद्धीचा प्रकार ऐक. ४५

ज्यापासून भूतांची प्रवृत्ति, आणि ज्याणे हें सर्व व्यापिलें आहे, त्याला आपल्या कर्मानें आराधून मनुष्य सिद्धीतें पावतो. ४६

जरि परधर्म उत्तम प्रकारें आचरिला, आ

॥मो॰ संन्यासयोग॥१८॥

णि यद्यपि स्वधर्म किंचित् अंगहीन असला, तथापि तो त्यापेक्षां अतिप्रशस्त होय. मनुष्य-स्वभाव नियतकर्मातें करित होत्साता दोषातें पावत नाहीं. ४७ स्वाभाविक कर्म सदोष असलें तरीं टाकूं नये. धूमानें जसा अग्नि, तसीं, सर्व कर्में दोषानें वेष्टित आहेत. ४८ सर्वत्र असक्त बुद्धि, आणि जितात्मा, ह्म॰ शांतचित्त, आणि विगतस्पृह, ह्म॰ तृष्णा रहित. असा पुरुष संन्यास ह्म॰ पूर्वोक्त सात्विक त्याग त्याणेंकरून परम नैष्कर्म्य सिद्धीतें पावतो. ४९ त्यासिद्धीस पावून जाप्रकारें तो ब्रह्मीं मिळतो तो प्रकार संक्षेपेंकरून मजपासून जाण–जी ज्ञानाची परनिष्ठा होय. ह्म॰ जापेक्षें अन्यजाणायाचें शेष नाहीं. ५०

विशुद्ध बुद्धीकरून युक्त असा, धर्येंकरून, आत्मा ह्म॰ देहेंद्रिय संघात, याचें नियमन करून, ह्म॰ दृढासन होवून, शब्दादिविषय,

× स्वरूपतः कर्मत्याग लक्षण सिद्धि

आणि राग, द्वेष, यांतें टाकून, ५१ एकांत. सेवा शील, तसा मिताहार, ज्याची वाणी, देह, आणि मन हीं नियमित असा, निरंतर ध्यान योग पर, आणि वैराग्याप्रत उपाश्रित, असा पुरुष, ५२ अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध, परिग्रह, लोभ, यांतें सोडून, ममता रहित, आणि शांत होत्साता, ब्रह्मत्वाकारणें योग्य होतो. ५३ तो ब्रह्मरूप पुरुष, प्रसन्न चित्त होत्साता, शोक आणि इच्छा करित नाहीं, आणि सर्व भूतीं सम असा, पर अशा माझ्या भक्तीतें पावून, तीच्या योगेंकरून माझें व्यापकत्व आणि स्वरूप यांस तत्वतः जाणतो-त्यानंतर मला तत्वेंकरून जाणून मन्मय होतो. ५५

मनुष्य माझाच आश्रय करून. निरंतर सर्व कर्मांतें करित होत्सा ताही, माझ्या प्रसादेंकरून शाश्वत अशा अव्यय पदाप्रत पावतो.

चित्तेंकरून सर्व कर्मांचें माझाठाईं अ-

र्पण कर; आणि मत्पर होत्साता, बुद्धियोगाचा आश्रय करून निरंतर मच्चित्त हो. ५७ कांकीं असें केल्यानें तूं मत्प्रसादें करून सर्व दुर्गें म्ह० संकटें यानें तरसील. यानंतर जर तूं माझें वचन अहंकारानें ऐकिणार नाहींस, तर नाश पावसील. ५८ जर अहंकाराचा आश्रय करून युद्ध करणार नाहीं असें मानितोस, तर हा तुझा निश्चय मिथ्या होय. कांकीं प्रकृति म्ह० स्वभाव तुला त्याकडेस योजील. ५९ मोहें करून जा कर्मातें करायास इच्छित नाहींस, त्या कर्मातें, स्वाभाविक अशा आपल्या कर्मानें बद्ध अपरवश होत्साता, करशील. ६०

ईश्वर मायेकरून, कालचक्रारूढ अशा सर्व भूतांस भ्रमण करवित होत्साता, त्यांचा हृदयदेशीं राहतो. ६१ हे भारता, त्यालाच सर्व भावें करून शरण जा. कांकीं त्याचा प्रसादें करून परशांतीतें, आणि शाश्वत स्थानाप्रत

## ॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

पावसील. ६२

असें परमगुह्य ज्ञान मी तुला सांगीतलें. याचा साकल्येंकरून विचार कर, आणि अनंतरनु ला उत्तम दिसेल तसें कर. ६३

सर्व गुह्यांत अतिगुह्य असें माझें श्रेष्ठ वचन पुनः ऐक. नें, तूं माझा इष्ट होस, अतएव तुझा हितार्थ सांगतों. ६४ मच्चित्त असा माझा भक्त हो-माझेंच यजन कर-आणि मलाच नमन कर-ह्मणजे मत्प्रत पावसील. हें तुला मी प्रतिज्ञापूर्वक सत्य सांगतों-कांकीं तूं माझा प्रिय आहेस. ६५ सर्व धर्मातें टाकून मला एकासच शरणजा-मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन-शोक करूं नकोस. ६६

हें पूर्वोक्त ज्ञान तूं, तपोरहित, आणि अभक्त, गुरुसेवा न करणारा तसा माझी निंदाकरणारा, अशा पुरुषाकारणें कधींही सांगूं नये. ६७

जो पुरुष हें परमगुह्य माझा भक्तांप्रत व

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

णील, तो माझाठाई परभक्तीतें करून निःसंशय मजप्रतच पावेल. ६८ त्याहून मला मनुष्यांत कोणी अत्यंत प्रिय कर्त्ता नाहीं, आणि पृथ्वींत होणार नाहीं. ६९

या आमच्या धर्म्य संवादाचें जो अध्ययन करील, त्या पुरुषानें ज्ञान यज्ञेंकरून माझें यजन केलें अशी माझी मति होय. ७०

जो पुरुष दोषदृष्टिरहित, श्रद्धेकरून या संवादाचें श्रवणमात्र करील, तोही मुक्त असा पुण्यकर्त्यांचा शुभ लोकांप्रत पावेल. ७१

हे अर्जुना, मीजें सांगीतलें तें त्वां एकाग्र चित्तेंकरून ऐकिलें कीं ? हे धनंजय, तुझा अज्ञान संमोह गेला कीं ? ७२

अर्जुन बोलतो - हे अच्युत, तुझा प्रसादेंकरून माझा मोह नाश पावला - मला स्मृति आली - मी गतसंदेह झालों - आतां तूं सागशील तें ऐकेन. ७३

## ॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

संजय, राजा धृतराष्ट्राप्रत ह्मणतात - हे राजा, या प्रकारें महात्मा असा वासुदेव, आणि पार्थ यांचा अद्भुत आणि रोमहर्षण असा संवाद आतें मी ऐकिता जाहलों. ७४ व्यासाचा प्रसादें करून हें परम गुह्य साक्षात् कृष्णाचा मुखापासून माझा कानीं पडलें - आणि मी योग ह्मणजे विश्वरूपरवही पाहिलें. ७५ हे राजा, या कृष्णार्जुनाचा पुण्य. आणि अद्भुत असा संवाद तें पुनःपुनः स्मरून, मी वारंवार हर्ष पावतों. ७६ आणि त्या हरीचा अत्यद्भुत रूपास पुनः पुनः स्मरून, मला महान् विस्मय होतो - आणि पुनःपुनः हर्ष पावतों. ७७ जेथे योगेश्वर कृष्ण, जेथे धनुर्धर पार्थ, तेथे श्री, विजय, ऐश्वर्य. आणि सुनीति राहतात, अशी माझी मति होय. ७८

समाप्त